cmyk



दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

गणपती बाप्पा मोरया

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–१३८ | रविवार दि.०८ सप्टेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

# ‘नाफेड’, ‘एनसीसीएफ’ च्या कांदा विक्री नफ्यात शेतकऱ्यांना वाटा द्या

## कांदा उत्पादक संघटनेसह शेतकऱ्यांची मागणी

**पुणे । प्रतिनिधी**

**केंद्र सरकारच्या भाव स्थिरीकरण निधी योजनेअंतर्गत बफर स्टॉकमधील कांदा बाजारात आणला जाणार आहे. यासाठी दुसरी निविदा देखील प्रसिद्ध करण्यात आली. यामुळे सध्या राज्यात कांद्याच्या दरात घसरण पाहायला मिळत आहे. यावरून शेतकऱ्यांसह संघटनांनी ‘नाफेड’, ‘एनसीसीएफ’च्या कांदा विक्री नफ्यात शेतकऱ्यांना वाटा द्या, अशी मागणी महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेचे अध्यक्ष भारत दिघोळे आणि इतर शेतकरी सघटना यांनी केली आहे.**

केंद्र सरकारच्या भाव स्थिरीकरण निधी योजनेअंतर्गत बफर स्टॉकमधील ५ लाख टन कांदा खरेदी करण्यात आला आहे. यामध्ये ‘नाफेड’कडून २ लाख १० हजार टन तर ‘एनसीसीएफ’ने २ लाख ४६ हजार टन कांदा खरेदी केला आहे. तो आता



विक्रीसाठी बाहेर काढला जाणार आहे. यापूर्वी मुंबई, बंगळुरू, भुवनेश्वर व पाटणा या शाखेच्या माध्यमातून बिहार, ओरिसा व कर्नाटकसाठी निविदा काढण्यात आल्या होत्या. तर आता ‘नाफेड’कडून देशांतर्गत दुसऱ्या टप्प्यात उत्तर प्रदेश, उत्तराखंड राज्यांत कांदा विक्रीसाठी निविदा काढण्यात आली आहे. या निर्णयामुळे कांद्याचा सरासरी भाव ४ हजार ते ४ हजार ३०० रुपयांपासून कमी होऊन ३ हजार ४०० ते ३ हजार ९०० रुपयांपर्यंत आला. तर बाजारात कांद्याचे भाव सरासरी ५०० रुपयांपर्यंत नरमले आहेत. यावरून कांदा उत्पादक शेतकरी चांगलाच संतापला आहे. दिघोळे यांनी केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांच्या कांद्याच्या वक्तव्यावर संताप व्यक्त केला आहे. तर सरकार फक्त शेतकऱ्यांमध्ये एकजूट नसल्यानेच लूट करत असल्याची टीका केली आहे. सरकार फक्त शेतकऱ्यांच्याबाबतीत पान २ वर

### सरकारचे धोरण नफा कमाविण्याचे...

केंद्र सरकारच्या कांद्याच्या राजकारणाने पुन्हा एकदा कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या ताटात माती कालवल्याचा आरोप दिघोळे यांनी केला आहे. तर सरकारने भाव स्थिरीकरण निधी योजनेअंतर्गत ‘नाफेड’, ‘एनसीसीएफ’च्या मार्फत रब्बीचा कांदा १६ रूपये दराने खरेदी केला. तर तो आता बाजारात ३५ रूपयांनी आणला जात आहे. यामुळे सरकार नफा कमवत असून शेतकऱ्याचे वेळोवेळो आर्थिक नुसकान झाले आहे. याआधी निर्यात बंदी आणि निर्यातीवर ४० टक्के शुल्क लावून कांदा उत्पादकांकडून भरमसाठ नफा सरकारने कमावला आहे. तर आताही या निर्यातून २० रूपयांपर्यंत नफा सरकारच कमावणार आहे. त्यामुळे या नफ्यात कांदा उत्पादक शेतकऱ्यांना वाटा मिळावा, अशी मागणी दिघोळे यांनी केली आहे.

# राऊतांमध्ये फितुरीचे संस्कार, त्यापेक्षा तो सोपल बरा

## मी राजगादीला मानतो हे उदयराजेंना माहितीये, घोंगडी बैठक होणार–मनोज जरांगे







**जालना । प्रतिनिधी**

**आमदार राजेंद्र राऊत यांनी केलेल्या आरोपांना मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवाली सराटी येथे प्रत्युत्तर दिलं आहे. मी फुकलो तरी उदयराजे भोसले लोकसभा निवडणुकीत पडले असते, असे जरांगे म्हणाले होते, असा दावा राऊत यांनी केला होता. राजेंद्र राऊतांच्या आरोपांना प्रत्युत्तर देताना मनोज जरांगे म्हणाले, मी राजगादीला किती मानतो हे उदयनराजे महाराजांना, कल्पना राजे मासाहेबांना आणि छत्रपती संभाजीराजेंना माहिती आहे. राजेंद्र राऊतांमध्ये फितुरीचे संस्कार आहेत. बार्शीतील राजेंद्र राऊतांचे विरोधक माजी आमदार दिलीप सोपल बरे आहेत. मराठ्यांच्या विचारांचे ओबीसी आहेत, असे जरांगे यांनी आ. राऊत यांच्यावर हल्लाबोल केला.**

यावेळी पुढे बोलताना मनोज जरांगे म्हणाले, मी राजगादीला किती मानतो हे उदयनराजे महाराजांना, कल्पना राजे मासाहेबांना आणि छत्रपती संभाजीराजेंना माहिती आहे. राऊत कशाचाही शपथ घेतो, माझ्याजवळच त्यांनी पाच–पन्नास शपथ घेतल्या असतील. तुला देवेंद्र फडणवीसाचे सरकार निवडून यावे असे वाटते तर आरक्षण का देत नाही? आम्हाला प्रश्न विचारणारा तू कोण? तुला वेळ पान २ वर

### जरांगेंच्या विरोधात मराठा समाज उभा करायला वेळ लागणार नाही–दरेकर

मनोज जरांगे यांच्या आंदोलनाला आता प्रतिसाद मिळत नाही. त्यांनी महाविकास आघाडीची बाजू घेतल्याचे वारंवार दिसून आले आहे. त्यामुळे मराठा समाजाचा प्रतिसाद कमी कमी होत चालला आहे. मराठा समाजाचा सात बारा तुमच्या नावावर लिहीलाय का ? असेही दरेकर यांनी जरांगे पाटील यांना आव्हान दिले आहे. तसेच मनोज जरांगे यांच्या विरोधात सगळा मराठा समाज उभा करायला वेळ लागणार नसल्याचेही दरेकर म्हणाले.

# अर्ज भरणाऱ्या ११ संस्थांचे अधिकार रद्द आता एका जागेवरच भरता येणार अर्ज

**मुंबई । प्रतिनिधी**

**मध्य प्रदेश सरकारप्रमाणे महाराष्ट्र सरकारने देखील लाडकी बहीण योजने लागू केली आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने अंतर्गत महिन्याला १५०० रुपये दिले जात आहेत. राज्यभरातील लाखो महिलांच्या खात्यात लाडकी बहीण योजनेचे पैसे जमा झाले आहेत. लाडकी बहीण योजनेबाबात सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. लाडकी बहीण योजनेचे अर्ज भरणाऱ्या ११ संस्थांचे अधिकार सरकारने रद्द केले आहेत.**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे अर्ज नागरी व ग्रामीण भागातील बालवाडी सेविका आणि अंगणवाडी सेविका, समूह संघटक, मदत कक्ष प्रमुख, आशा सेविका, सेतू सुविधा केंद्र, आंगणवाडी पर्यवेक्षिका, ग्रामसेवक आणि आपले सरकार सेवा केंद्र यांना होते. मात्र, या ११ प्राधिकृत संस्थांकडचे अर्ज भरून घेण्याचे अधिकार रद्द करण्याचा निर्णय गुरुवारी झालेल्या कॅबिनेटच्या बैठकीत पान २ वर

अर्ज भरणाऱ्या ११ संस्थांचे अधिकार रद्द; आता एका जागेवरच भरता येणार अर्ज



लाडकी बहीण योजना

### हरियाणात आपचे स्वबळाचे संकेत

नवी दिल्ली : हरियाणा विधानसभा निवडणुकीपूर्वी आम आदमी पार्टी (आप) आणि काँग्रेस यांच्यातील आघाडी तुटण्याच्या मार्गावर आहे. आपने राज्यातील सर्व ९० विधानसभा जागांवर आपले उमेदवार उभे करण्याचे संकेत दिले आहेत. पक्षाच्या प्रवक्त्या प्रियंका कक्कर यांनी सांगितले की, पक्षाकडून आगामी एक ते दोन दिवसांत उमेदवारांची पहिली यादी जाहीर करण्यात येणार. दरम्यान, काँग्रेसने ३२ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. प्रियांका कक्कर म्हणाल्या, आमची चर्चा सुरू आहे. मात्र सध्या पान २ वर

# राज्यातील जनतेला सुख, समृद्धी मिळू दे!

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे बाप्पांना साकडे

**मुंबई । प्रतिनिधी**

**गणेशोत्सवानिमित्त शनिवारी ‘वर्षा’ या शासकीय निवासस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सपत्नीक गणरायाची विधिवत पूजा करुन प्रतिष्ठापना केली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी राज्यातील जनतेला सुख समृद्धी मिळू दे, अशी प्रार्थना केली. दरवर्षीप्रमाणे यंदाही मुख्यमंत्र्यांच्या ‘वर्षा’ निवासस्थानी गणरायाचे आगमन झाले. यावेळी मुख्यमंत्र्यांनी राज्यातील जनतेला गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या.**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, गणरायाचे आगमन झाले आहे. आपल्या आयुष्यात पण आनंद, समाधान, समृद्धी येवो, सर्वांना सुबुद्धी मिळो पान २ वर



# राज्यात महाविकास आघाडीचे सरकार यावे

## एकनाथ खडसे यांनी पुन्हा शरद पवारांच्या बाजूने घेतली भुमिका

**जळगाव । प्रतिनिधी**

महायुती सरकार उट्टे काढण्याचे काम करत असल्याने जनतेची कामे होत नाहीत. लाडकी बहीण योजनेला ४६ हजार कोटी द्या आणि त्यासोबतच ४६ हजार कोटी रुपये धरणे, रस्ते निर्मितीसाठी द्या म्हणजे त्यातून स्थायी मालमत्ता निर्माण होईल. त्यामुळे हे सरकार जावे आणि महाविकास आघाडी सरकार यावे, असे आपल्याला वारंवार वाटत असल्याची प्रतिक्रिया एकनाथ खडसे यांनी दिली आहे.



पान २ वर

### अर्थ खात्याची पाठराखण

कॅबिनेट मंत्री गुलाबराव पाटील यांनी अर्थ खात्याच्या कारभाराबद्दल टीका केली होती. त्यानंतर अजित दादांच्या अर्थ खात्याची एकनाथ खडसे यांनी पाठराखण केली आहे. आपणही अर्थमंत्री राहिलो आहे, अर्थ खात्याचे काम करताना प्राधान्य क्रम ठरून निधी द्यावा लागत असतो. त्याला विलंब होऊ शकतो, असे ते म्हणाले.

# वादग्रस्त पूजा खेडकर अखेर आयएएसमधून बडतर्फ

**नवी दिल्ली। वृतसंस्था**

**वादग्रस्त अधिकारी पूजा खेडकर यांना केंद्र सरकारने इंडियन ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सर्व्हिसमधून शनिवारी बडतर्फ केले. केंद्राने नियम १९५४ मधील तरतुदींनुसार ही कारवाई केली आहे.**



खेडकर यांच्यावर चुकीच्या पद्धतीने ओबीसी आणि दिव्यांग सवलत घेतल्याचा आरोप आहे. सध्या त्या अंतरिम जामिनावर आहेत. पूजा खेडकर यांच्या जामीन अर्जालाही युपीएससीने विरोध केला पान २ वर

# शरद पवारांना सोडणे माझी चूक अजित पवारांची अप्रत्यक्ष कबुली

**गडचिरोली । प्रतिनिधी**

शरद पवारांना सोडणे ही माझी चूक होती, अशी नाव न घेता जाहीर कबुली उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी एका जाहीर कार्यक्रमात दिली आहे. राज्याचे अन्न व प्रशासन मंत्री तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार धर्मारावबाबा आत्राम यांची कन्या भाग्यश्री आत्राम हलगेकर या लवकरच शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश करणार आहेत. यापार्श्वभूमीवर अजित पवारांनी त्यांचे मन वळवण्याचा प्रयत्न केला आणि यावेळी ते आपली कबुली देवून पान २ वर





### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.०४ सप्टेंबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : १२.५० क्विंटल | २,६१० | ३,२८० | २,८११ |
| ज्वारी/हायब्रिड :१२३.०० क्विंटल | २,००० | ३,००१ | २,२७० |
| मूग : १११.०० क्विंटल | ५,९०० | ८,२७५ | ७,५७९ |
| तूर : १.०० क्विंटल | ८,५०० | ८,५०० | ८,५०० |
| उडीद : ५६.५० क्विंटल | ७,००१ | ८,००० | ७,५७९ |
| बाजरी:२६.५० क्विंटल | २,००० | २,७०१ | २,४४८ |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: १९४.५० क्विंटल | ४,५५० | ४,६२५ | ४,५७७ |
| हरभरा: ३.०० क्विंटल | ५,७०० | ७,२०० | ६,७०० |

# गणेश पुजनाला जायकवाडी शंभर टक्के भरले!

## मराठवाड्यातील विष्णूपुरी, सिद्धेश्वरसह उर्वरित धरणांची काय स्थिती?

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

**मराठवाड्याच्या पाणीसाठ्यावरून कायम चिंता व्यक्त होत असताना मराठवाड्यातील हजारो गावांची तहान भागवणारे जायकवाडी धरण गणेशपुजनाला १०० टक्के भरले आहे,. त्यामुळे मराठवाड्याची तहान आता भागणार आहे. मराठवाड्यातील बहुतांश धरणे आता भरत आली असली तरी राज्याच्या तुलनेत ६५.३५ टक्के धरणे भरली आहेत. जलसंपदा विभागाने दिलेल्या माहितीनुसार, मागील वर्षी जायकवाडी धरणात ३२.६९ टक्के पाणीसाठा होता. आता धरण १०० टक्के भरले आहे.**



बीड जिल्ह्यात मागील आठवड्यात झालेल्या पावसाने जिल्ह्यात काही दिवसांपूर्वी अतिवृष्टीची नोंद झाली होती. आता माजलगाव धरणात २८ टक्के आणि मांजरा धरणात ७१.६६ टक्के पाणीसाठा आहे. काही दिवसांपूर्वी शुन्यावर असणारें माजलगाव धरण एका दिवसाच्या पावसात थेट १८ टक्क्यांवर गेले. हिंगोली सिद्धेश्वर धरणही फुल्ल झाले असून मागच्या वर्षी ४५.९३ टक्के पाणी भरले होते. येलदरी धरण ६५ टक्के भरले असून हिंगोलीत पूर आल्यानंतर आता हिंगोलीतील दोन्ही धरणांमध्ये पाणीसाठ्यात वाढ होत आहे. नांदेडचे विष्णूपुरी धरण ९१.४७ टक्के आणि निम्न मनार धरण १०० टक्के भरले आहे. त्यामुळे नांदेडकरांना आता दिलासा पान २ वर

### मराठवाड्यात जोरदार पावसाची शक्यता

*मागील आठवड्यात झालेल्या पावसाने मराठवाड्यात नागरिकांची दाणादाण उडाली होती. हजारो हेक्टरवरील शेती पाण्याखाली गेल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. आता हवामान विभागाने पुढील तीन दिवसांसाठी मराठवाड्याला पावसाचा इशारा दिला असून, त्यानंतर हलक्या ते मध्यम सरींचा अंदाज आहे. बंगालच्या उपसागरात कमी दाब क्षेत्राची निर्मिती झाली आहे. त्याला लागूनच ७.६ किलोमीटर उंचीपर्यंत चक्राकार वाऱ्यांची स्थिती आहे. उत्तर ओडिशा, दक्षिण पश्चिम बंगालच्या किनाऱ्याकडे येताना ही प्रणाली आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे. यामुळे जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.*

cmyk

## अग्रलेख

# ‘अपराजिता’ चे स्वागतच मात्र अंमलबजावणीचे काय?

पश्चिम बंगाल सरकारने महिला आणि लहान मुलांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून त्याचप्रमाणे लैंगिक अत्याचार, शोषण आणि बलात्काराच्या घटनांना प्रतिबंध करणारे अपराजिता महिला आणि बाल विधेयक मंगळवारी राज्य विधानसभेत मांडले आणि ते सर्वानुमते मंजूर करण्यात आले. ‘अपराजिता’ विधेयकामध्ये महिलांवरील अत्याचारासंबंधी प्रकरणांमध्ये जलद तपास, जलद न्याय आणि दोषींना कठोर शिक्षा या तरतुदींचा समावेश आहे. कोलकातामधील आरजी कर रुग्णालयात एका महिला डॉक्टरवर बलात्कार करून तिची हत्या करण्यात आली होती. त्यानंतर कठोर कायदा करण्यासाठी ममता बॅनर्जी सरकारने हे नवे विधेयक आणले आहे. त्याला सर्वानुमते मंजुरी मिळाल्याने त्याचे कायद्यात रुपांतर होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

बलात्कार, सामूहिक बलात्कार प्रकरणातील आरोपींना जन्मठेपेची शिक्षा देण्याची तरतूद विधेयकामध्ये आहे. जोपर्यंत आरोपीला नैसर्गिक मृत्यू येत नाही तोपर्यंत ही शिक्षा असेल. त्याप्रमाणे बलात्कार पीडितेचा मृत्यू झाल्यास आरोपीला फाशीची शिक्षा देण्याची तरतूदही आहे. बलात्कार प्रकरणाच्या तपासासाठी २१ दिवसांची मुदत असून त्या कालावधीत तपास पूर्ण झाला नाही तर आणखी १५ दिवसांची मुदत वाढवून मिळणार आहे. या १५ दिवसांच्या कालावधीतील तपास पोलिस अधीक्षक आणि त्यावरच्या पदावरील अधिकाऱ्यांच्या नेतृत्वात बदल केला जाणार आहे. त्याचप्रमाणे बलात्काराचे खटले शीघ्रगती न्यायालयात चालविण्याची तरतूदही आहे. या विधेयकात खून आणि बलात्कारासाठी फाशीची शिक्षा तसेच पॅरोलशिवाय जन्मठेपेची शिक्षा यासारख्या कठोर तरतुदी करण्यात आल्या आहेत. विधेयकात गुन्हा दाखल झाल्याच्या २१ दिवसांत तपास पूर्ण झाल्यास व दोष सिद्ध झाल्यास १० दिवसांमध्ये फाशी देण्याची तरतूद आहे.

पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आक्रमक नेत्या म्हणून ओळखल्या जातात. ‘अपराजिता’ विधेयक मंजूर करून घेण्यात ममता बॅनर्जी यांनी मुत्सद्देगिरी दाखवली असेही काही जणांना वाटते. या आधी काही राज्यांनी अशा प्रकारचे कायदे आणण्याचा प्रयत्न केला मात्र ते विधानसभेत मंजूर होऊ शकले नाहीत. त्यामुळे ममता बॅनर्जींचा हा निर्णय ‘मास्टरस्ट्रोक’ ठरेल की नाही ते काळच ठरवेल. ‘अपराजिता’ विधेयक मांडताना ममता बॅनर्जी म्हणाल्या, दोषींना जरब बसेल अशी शिक्षा आणि पीडितांना अधिक जलद न्याय मिळेल यासाठी केंद्र सरकारने सध्याच्या कायद्यांमध्ये दुरुस्ती करावी आणि त्यामध्ये अधिक कठोर कलमांचा समावेश करावा अशी आमची इच्छा होती. मात्र, त्यांनी त्यामध्ये काही रस दाखवला नाही. त्यामुळे आम्ही आधी पाऊल उचलले. एकदा हे विधेयक लागू झाले की उर्वरित देशासाठी ते एक प्रारूप म्हणून काम करेल. विधेयक मांडले जात असताना तृणमूल काँग्रेस आणि भाजप सदस्यांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू होते. कोलकात्यामधील आरजी कर वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयामधील शिकाऊ डॉक्टरवरील बलात्कार आणि हत्या प्रकरणानंतर पश्चिम बंगाल सरकारने अक्षम्य असहकार्य केले असा गंभीर आरोप करत केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

पश्चिम बंगाल सरकारने अपराजिता विधेयक मंजूर केल्यामुळे बलात्कारातील आरोपींना लवकरात लवकर फाशी देणे सोपे होणार आहे. मात्र, कायदा झाल्यामुळे अत्याचार थांबतील का हा मूळ प्रश्न आहे. कायदा होऊन किती आरोपींना अटक झाल्यानंतर आणि गुन्हा सिद्ध झाल्यानंतर कितव्या दिवशी फाशी झाली याचा दशकभराचा आढावा घेतल्यास हे प्रमाण ०.१ टक्के असल्याचे दिसून येते. फाशीची शिक्षा झाल्यानंतर आरोपी राष्ट्रपतींकडे दयेचा अर्ज करतात आणि हे अर्ज वर्षानुवर्षे धूळ खात पडून राहतात हा आजवरचा अनुभव आहे. वास्तविक पाहता बलात्कार करणाऱ्यांपेक्षा त्यांना वाचवणारी व्यवस्था जास्त खतरनाक आहे. कोलकाता बलात्कार प्रकरणात हेच दिसून आले आहे. बलात्कार झालेल्या महिला डॉक्टरांच्या पालकांनी याचा जिवंतपणी अनुभव घेतला आहे.

‘अपराजिता’ विधेयक मंजूर झाल्याने या कायद्यातील शिक्षेचे प्रावधान बघता जाणीवपूर्वक असा गुन्हा करण्याचे धाडस कोणीही करू शकणार नाही. महिलांवरील अत्याचारासंबंधात आंध्र प्रदेश सरकारने २०१९ मध्ये दिशा कायदा मंजूर केला होता. त्यानंतर महाराष्ट्र सरकारने २०२१ मध्ये शक्ती कायदा मंजूर केला होता. हे सर्वच कायदे गुन्हेगारांसाठी धाक निर्माण करणारे आहेत. परंतु हे सर्वच कायदे तूर्तास तरी कागदावरच आहेत. आंध्र प्रदेशचा ‘दिशा’ आणि महाराष्ट्र सरकारचा ‘शक्ती’ हे दोन्ही राज्यांचे प्रस्तावित कायदे प्रलंबित आहेत. त्यामुळे प. बंगालचा अपराजिता कायदा तातडीने अमलात येण्याची शक्यता नाही. मुळात कायदा आणि कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांचा आता धाकच उरलेला नाही. मुली- महिलांविषयी आपल्या समाजामध्ये आदरभाव निर्माण करण्याची, त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलण्याची खरी गरज आहे. अत्याचाराविरोधात महिलांनीसुद्धा धैर्याने पुढे येण्याची गरज आहे. अत्यंत महत्त्वाचे म्हणजे पुरुषी मानसिकता बदलणे आवश्यक आहे.




**गणपती बप्पांचे आगमन..!**

**गणेश चतुर्थी निमित्त बीड जिल्हा उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांच्या जनसंपर्क कार्यालय बार्शी रोड बीड येथे गणरायाची उत्साहात प्रतिष्ठापना झाली. यावेळी माझ्यासह दिपक घोडके, गोरख भटे,राम वडमारे, राकेश ढोले व सर्व सहकारी उपस्थित होते.**

# दिंद्रुड पंचक्रोशीत पिकांचे अतोनात नुकसान

## सरसकट नुकसान भरपाई देण्याची मागणी

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

**परिसरात संततधार पावसामुळे शेतीचे अतोनात नुकसान झाले आहे. पावसामुळे अनेक शेतात पाण्याचे तळे तयार झाले आहेत. तर नदी व ओढ्या काठची पिके वाहून गेली आहेत. साहजिकच शेतकरी हतबल झाला असून नुकसानीचे पंचनामे करण्याचा दिखावा न करता शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी होत आहे.**

चालू आठवड्यात पावसाने चांगलाच मुक्काम ठोकला असून सतत पडणाऱ्या पावसामुळे कापूस, सोयाबीन, तुर, मुग, उडीद, बाजरी या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांचे सहा महिन्याचे कष्ट व मेहनत पाण्यात गेली आहे. महागामोलाचे बियाणे, खते, कीटकनाशके खरेदी करून अंतर्मशागतीसाठीही शेतकऱ्याला मोठा खर्च आला आहे. पावसामुळे झालेल्या आर्थिक नुकसानीची तीव्रता पाहता शेतकऱ्यांना निसर्गाच्या अवकृपेचा मोठा फटका बसला आहे. या आठवड्यात बीड जिल्ह्यासह मराठवाड्यात पावसाने बऱ्यापैकी मुक्काम ठोकला आहे. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेलं सोयाबीन, तीळ, कापूस, कांदा, मुग,मका यासारख्या पिके भुईसपाट झाली आहेत. आता जगायचं कसं? हाच यक्षप्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे. शेतात केलेल्या कष्टाचा मोबदला तर सोडाच परंतु केलेला खर्च तरी मिळेल की नाही? या चिंतेने शेतकरी हताश झाला आहे. मात्र अद्याप पर्यंत तरी शेतकऱ्यांना धीर देण्यासाठी कोणताही पुढारी, लोकप्रतिनिधी, अधिकारी किंवा कर्मचारी शेतकऱ्यांच्या बांधावर आलेला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना कोणी वाली आहे का नाही? असा प्रश्न उपस्थित होत आहे. यावर्षी पावसाने जून महिन्यात चांगली सुरुवात केली. त्यामुळे मागील वर्षी कोरड्या दुष्काळात होरपळणाऱ्या शेतकऱ्यांना थोडासा धीर आला होता.



शेतकऱ्यांनी माहागामोलाचे बियाणे खरेदी करून काळ्या आईची ओटी भरली. बियाणे, खते,कीटकनाशके आदी खरेदी करण्यासाठी खिशात पैसा नसलेल्यामुळे पैशांची जुळवाजुळव केली. वरचेवर हवातसा पाऊस पडत गेल्यामुळे शेतकऱ्यांनी मोठ्या आनंदाने पिकाची मशागत केली. साहजिकच पीकेही जोमात आली होती. यंदा आपल्याला चांगले उत्पादन मिळणार अशी शेतकऱ्यांना आस लागली होती. शिवार कसा हिरवागार झाल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण होतं. मात्र या आठवड्यात झालेल्या जास्तीच्या पावसामुळे केवळ पिकाचेच नुकसान झालं नाही तर अनेक शेतकऱ्यांच्या शेती सुद्धा खरडून गेल्या. अनेक शेतकऱ्यांचे एवढे नुकसान झाले की, ते भरपाई मागण्या पलीकडे आहे. शासन व प्रशासन दरवेळी पंचनामे करते मात्र मदत दिली जात नाही. त्यामुळे केवळ पंचनाम्याचा दिखाऊपणा न करता जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ पावले उचलून कोणतेही पंचनामे न करता शेतकऱ्याच्या खात्यात आर्थिक मदत वर्ग करावी अशी मागणी होत आहे.

# मा.आ.भीमराव धोंडे यांच्या आनंद चॅरिटेबल संस्थेला इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळेला शासनाची मान्यता

**आष्टी । प्रतिनिधी**

मा .आ.भीमराव धोंडे यांच्या प्रयत्नातून आनंद चॅरिटेबल संस्था संचलित आष्टी पब्लिक स्कूल आष्टी या इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळेला शासनाची मान्यता मिळाली असून या शाळेमध्ये धनगर समाजाच्या मुला मुलींना मोफत शिक्षण व वस्तीगृहात मोफत प्रवेश मिळणार आहे तसेच जिल्ह्यातील व इतर जिल्ह्यातील सर्व पालकांना आनंदाची बातमी की सर्व गरीब ,हुशार होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षण व वस्तीगृहात प्रवेश मोफत मिळणार आहे आष्टी- पाटोदा- शिरूर विधानसभा मतदारसंघातिल व बीड सह इतर जिल्ह्यातील सामाजिक, शैक्षणिक ,विद्यार्थी व पालक यांच्या कडून संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा.आ. भीमराव धोंडे व संस्थेचे सहसचिव डॉ अजय दादा धोंडे , प्रशासन अधिकारी डॉ डी बी राऊत, शिवदास विधाते, माऊली बोडखे, संजय शेंडे यांचे अभिनंदन होत आहे तरी आष्टी -पाटोदा -शिरूर व इतर तालुक्यातील विद्यार्थी यांनी या मोफत प्रवेशाचा लाभ घ्यावा असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे प्रवेशासाठी प्रत्यक्ष आष्टी- अहिल्या नगर रस्त्यालगत असणार्या आष्टी पब्लिक स्कूल येथे संपर्क साधावा किंवा ९८६०७०५३९८, ९४०४०२९५५५ या नंबर वर संपर्क साधावा



# १०८ किलो चांदीचा व सोन्याचा सुवर्ण मुलावा अनोखा गणपती विराजमान

**जालना । प्रतिधि**

**रिध्दी- सिद्धीचा दाता, विघ्नहर्ता गणराया चे गणेश चतुर्थीच्या मुहूर्तावर सर्वत्र जल्लोषात आगमन झाले. संपूर्ण महाराष्ट्रात ख्याती प्राप्त जालना शहरातील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक परिसरात श्री अनोखा गणेश मंडळातर्फे १०८ किलो वजनी चांदीची सोन्याचा (सुवर्ण) मुलावा असलेल्या गणपती बाप्पांच्या मनमोहक मूर्तीस जल्लोष आणि थाटात विराजमान करण्यात आले.**




खामगाव येथून जालना शहरातील छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाजवळ मंडळ स्थळी बाप्पांचे आगमन होताच फटाक्यांचा आतिषबाजी करत गणपती बाप्पा मोरया,मंगल मुर्ती मोरया,असा जल्लोषात गजर करण्यात आला. उद्योजक राहुल अग्रवाल दाम्पत्याच्या यांच्या हस्ते विधीवत पूजन करून आरती करण्यात आली. या वेळी मंडळाचे अध्यक्ष अनिल गोयल,योगेश मानधना, संस्थापक अजय ( जगदीश) भरतिया, कार्याध्यक्ष संजय अग्रवाल ( रूपम), डॉ.अरविंद सोनी, जगदीश मुंदडा, धीरेंद्र मेहरा,डॉ.रितेश मिश्रा,अतुल मंत्री, महेश सारस्वत,हर्षद चोरडिया, राजेश अग्रवाल, राजकुमार दायमा, अनिल पंच, गौरीशंकर देवीदान, पुरूषोत्तम भक्कड, रोहित भुरेवाल, गणेश तिवारी, मनोज बंब, अजय अग्रवाल, आलोक गोरंट्याल, गणेश भुरेवाल,जतीन अग्रवाल, यश देवीदान, यांच्या सह मंडळाचे सदस्य, श्री भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. दरम्यान दरवर्षी प्रमाणे यंदा ही भाविकांना वेगवेगळे देखावे, प्रसाद, कुटुंबियांसह आनंद घेता येईल असा मंडळाच्या नावाप्रमाणेच अनोखा गणेशोत्सव साजरा होणार असल्याचे संस्थापक अजय ( जगदीश) भरतिया, अध्यक्ष अनिल गोयल, योगेश मानधना यांनी सांगितले.

# मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीने रचला महाविक्रम

## लोककल्याणकारी शिंदे सरकारची संवेदनशिलता; ४० हजार रूग्णांचे वाचले प्राण; ३२१ कोटींहून अर्थसहाय्य वितरित

**मुंबई । प्रतिनिधी**

**मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाने रुग्णसेवेत उत्कृष्ट कामगिरी करुन राज्यातील हजारो रुग्णांच्या जीवनात निरायम आरोग्याचा प्रकाश आणला आहे. या योजनेमुळे अनेक रुग्णांना अक्षरशः जीवनदान मिळत असल्याने ही योजना आता महाराष्ट्र राज्य सरकारची महत्वाकांक्षी योजना ठरत असल्याचे प्रतिपादन राज्याचे संवेदनशील मुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे यांनी केले आहे. गोरगरीब-गरजू रुग्णांना दुर्धर आणि महागड्या शस्त्रक्रियांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षातून थेट अर्थसहाय्य केले जात आहे. या योजनेमुळे रुग्णांचे प्राण वाचत असल्याने मुख्यमंत्री कार्यालयात आलेला एकही रुग्ण हा मदतीविना वंचित राहता कामा नये याची दक्षता घेण्याचे आदेश मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी दिले आहेत. यानुसार आपल्या सातत्यपूर्ण कामगिरीचा आलेख कायम राखत या कक्षाने गेल्या २ वर्षं २ महिन्यामध्ये ४०,००० हून अधिक गोरगरीब-गरजू रुग्णांना एकूण ३२१ कोटी रूपयांची आर्थिक मदत वितरित केली आहे.**



एकनाथजी शिंदे यांनी मुख्यमंत्री पदाचा कार्यभार स्विकारताच महाविकास आघाडी सरकारच्या काळात बंद पडलेला मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष तात्काळ सुरू केला. मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाची मूळ संकल्पना मांडणाऱ्या मंगेश नरसिंह चिवटे यांची विशेष कार्य अधिकारी म्हणून नियुक्ती करून मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी या कक्षाची जबाबदारी दिली होती. मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता मदत मिळवण्यासाठी मंत्रालयात जाण्याची ही गरज नाही पूर्णपणे ऑनलाईन प्रोसेस करून वैद्यकीय मदत मिळणार असल्याचे कक्ष प्रमुख मंगेश चिवटे यांनी सांगितले. यासाठी ८६५०५६७५६७ या टोल फ्री क्रमांकावर कॉल करून थेट आपल्या मोबाईलवर अर्ज मिळविता येईल. संवेदनशील मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या सूचनेनुसार मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी मध्ये अनेक-विविध आजारांचा समावेश देखील करण्यात आला असल्याची माहिती यावेळी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष प्रमुख मंगेश नरसिंह चिवटे यांनी दिली आहे. यामध्ये अँजिओप्लास्टी, बायपास सर्जरी, कर्करोगावरील शस्त्रक्रिया, केमोथेरपी, डायलिसिस, जन्मतः मूकबधिर लहान मुलांच्यासाठी अत्यावश्यक असणारी कॉकलीयर इनप्लांट शस्त्रक्रिया, सर्व प्रकारचे अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, रस्ते अपघात, विद्युत अपघात, भाजलेले रूग्ण, जन्मतः लहान मुलांच्या हृदयशस्त्रक्रिया आदींचा समावेश आहे. दुर्धर आजारांनी ग्रस्त रुग्णांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन कक्ष प्रमुख मंगेश नरसिंह चिवटे यांनी केले आहे.

### जीवनदान मिळालेली ’दुवा’च ब्रॅण्ड ॲम्बेसडर

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्षाच्या ब्रॅण्ड ॲम्बेसडर पदी अवघ्या एक वर्षाच्या दुवा नावाच्या चिमुकलीची निवड करण्यात आलेली आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील कागल तालुक्यातील फहरीण मकुबाई आणि सादिक मकूबाई या मुस्लिम दांपत्याच्या पोटी जन्माला आलेल्या अवघ्या १३ दिवसांच्या बाळाचे प्राण मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या लाखमोलाच्या मदतीमुळे वाचले होते. दरम्यान सहा महिन्यानंतर कोल्हापूर येथे झालेल्या शासन आपल्या दारी कार्यक्रमात सदर मुस्लिम दांपत्याने संवेदनशील मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांच्या हातात बाळाला सुपूर्द करत मुख्यमंत्री महोदय यांच्या दुवामुळे बाळाचे प्राण वाचले असल्याने या चिमुकलीचे नाव दुवा ठेवणार असल्याची इच्छा प्रकट केली. तब्बल एक लाख लोकांच्या साक्षीने मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांनी या बाळाला हातात घेऊन सदरच चिमुकलीचे नाव दुवा ठेवत असल्याचे जाहीर केले.

### मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष गरजूंसाठी आशेचा किरण : मंगेश चिवटे

राज्यात शिंदे सरकार सत्तारूढ झाल्यापासून अनेक लोककल्याणकारी निर्णय घेतले. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाला उर्जितावस्था दिली. या कक्षाच्या माध्यमातून हजारो रूग्णांचे प्राण वाचले. शेकडो कोटींचा निधी वितरीत करण्यात आला. अगदी पहिल्या दिवसापासून मुख्यमंत्री महोदयांनी आदेश दिला होता. कोणतीही रूग्ण मदतीपासून वंचित राहू नये यासाठी पुरेपूर प्रयत्न करू शकलो. महाराष्ट्रातील गरजू आणि गरजवंतांना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष आशेचा किरण ठरला याचे समाधान वाटते, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे यांनी दिली.

## पान १वरून...



### ‘नाफेड’, ‘एनसीसीएफ’ च्या

हस्तक्षेप करत असून इतर ठिकाणी बघ्याची भूमीका घेत आहे. जेव्हा मोबाईलचा रिचार्ज वाढला तेंव्हा भ्र सुद्धा सरकारने किंवा सर्वसामान्यांनी काढला नाही. पण कांद्याच्या दर वाढला म्हणून ओरड केली जात असल्याचेही दिघोळे यांनी म्हटले आहे. जर सरकारला शेतकऱ्यांचा रोष बघायचा नसेल तर भाव स्थिरीकरण निधी योजनेप्रमाणेच एखादी योजना शेतकऱ्यांसाठी सुरू करावी. तर जेव्हा भाव पडलेले असतील तेंव्हा शेतकऱ्यांना आधार द्यावा, अशीही मागणी दिघोळे, यांनी केंद्र सरकारकडे केली आहे.

-----------

### अर्ज भरणाऱ्या ११ संस्थांचे अधिकार रद्द

घेण्यात आला आहे. यापुढे केवळ अंगणवाडी सेविकांमार्फत लाडकी बहीण योजनेसाठी आलेलेच अर्ज स्वीकारले जातील असा निर्णय घेण्यात आला आहे. १ सप्टेंबर नंतर अंगणवाडी सेविकांमर्फत भरले जाणारे अर्ज ग्राह्य धरले जाणार आहेत. महिला व बाल विकास विभागाकडून यासंदर्भातील शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. ऑनलाईन ॲप द्वारे देखील अर्ज स्वीकारले जाणार नाहीत असे देखील या जीआर मध्ये नमूद करण्यात आले आहे.

---------

### राऊतांमध्ये फितुरीचे संस्कार,

आल्यावर कळेल देवेंद्र फडणवीसांचे ऐकून तू किती चिखलात फसला. बार्शी मराठ्यांचे घर तिथं घोंगडी बैठक होणार आहे. राजेंद्र राऊत आपला असूनही त्याच्यामध्ये फितुरीचे संस्कार आहेत. त्याच्यापेक्षा सोपल बरा म्हणावं लागेल. मराठ्यांच्या विचारांचे ओबीसी आहेत, ते चांगले आहेत. राजेंद्र राऊत मराठ्यांचे तुकडे करायला निघालाय, असे जरांगे म्हणाले आहेत. जा मी लय बघितले लुंगे सुंगे, तू कशाला मराठे कापायची सुपारी येतो? असे म्हणत जोरदार हल्लाबोल केला.

--------

### राज्यात महाविकास

यावेळी पुढे बोलताना खडसे म्हणाले, लाडकी बहीण योजना सरकारने निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन आणली असल्याचे जनतेलाही कळते,ही योजना आणायची होती तर पाच वर्ष पूर्वीच आणायला पाहिजे होती. या योजनेला आपला विरोध नाही मात्र इकडे केलेला खर्च हा नॉन प्लॅन खर्च आहे, एवढाच खर्च जर धरणे उभारणी ,रस्ते निर्मिती साठी केला गेला तर त्यातून रोजगार ही निर्माण होऊ शकणार आहे, त्यासाठी ही प्रयत्न करायला हवे, असे एकनाथ खडसे म्हणाले.

-----------

### राज्यातील जनतेला सुख,

हीच प्रार्थना. प्रत्येक गणोशोत्सव एक नवी ऊर्जा, प्रेरणा आणि उत्साह घेऊन येतो. सगळीकडे मंगलमय आणि पवित्र वातावरण निर्माण होते. गणेशोत्सवातून महाराष्ट्राच्या महान संस्कृतीचे दर्शन घडते. सगळ्या जगाचे महाराष्ट्राकडे लक्ष लागलेले असते. या काळात महाराष्ट्राच्याच नाही तर देशात आणि विदेशातही मराठी माणसांत उत्साह-जोश दिसतो. हे शेतकऱ्यांचे, कष्टकऱ्यांचे सरकार आहे. यंदा राज्यात सगळीकडे खूप चांगला पाऊसही झाला आहे, त्यामुळे शेतकरी बांधवामध्येही उत्साह आहे. काही ठिकाणी अतिवृष्टीमुळे नुकसान झाले आहे. पण सरकार पूर्णपणे शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना सगळी मदत केली जाईल असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. तसेच, गणेशाची मनोभावे सेवा करतानाच, आपण सामाजिक बांधिलकची जाणीव ठेवूया. गरजू लोकांना मदतीचा हात द्या. आपण पर्यावरणाची काळजी घेणे पण गरजेचे आहे. आपले सणवार हे निसर्गाला पूरक असे असतात. त्यामुळे निसर्गाचे जतन-संवर्धन होईल, ही बाब लक्षात घेऊन सण साजरे करावेत, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले आहे.

-------------

### शरद पवारांना सोडणे माझी चूक;

बसले. ‘‘तुम्ही वडिलांसोबत राहा. वडिलांचे जेवढे लेकीवर प्रेम असते तेवढे कोणीच करु शकत नाही. असे असताना तुम्ही कुठेतरी घरातच फूट पाडण्याचा प्रयत्न करत आहात, हे बरोबर नाही. समाजाला हे आवडत नाही. आम्ही पण याचा अनुभव घेतलेला आहे, यातून मी माझी चूकही मान्य केली‘‘ अशा शब्दांत अजित पवारांनी अत्राम यांच्या कन्येला समजावण्याचा प्रयत्न केला. यातून त्यांनी आपली चूक झाल्याचे अप्रत्यक्षपणे कबूल केले असल्याचे दिसते.

----------

### वादग्रस्त पूजा खेडकर अखेर

होता. खेडकर यांनी फक्त आयोगाचीच फसवणूक केलेली नाही तर जनतेचीही फसवणूक केलेली आहे, असे युपीएससीने म्हटले होते. जुलै महिन्यात युपीएससीने त्यांची प्रोबेशनवरील उमेदवारी रद्द केली होती. खेडकर यांनी नियमांचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आल्यानंतर ही कारवाई करण्यात आली होती. तर आता त्यांना सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे.

---------

### गणेशपुजनाला जायकवाडी

मिळाला आहे. धाराशिव आणि लातूर जिल्ह्यातील बहुतांश धरणे भरले असून, निम्न तेरणा ६७ टक्के तर लातूरच्याही धरणांमध्ये पाणीसाठ्यात वाढ झाल्याचे जलसंपदा विभागाने नोंदवले आहे. परभणीच्या निम्न दुधना धरण ७४.६७ टक्के पाणी शिल्लक झाले आहे.

-------

### हरियाणात आप चे

काही सांगणे कठीण आहे. हरियाणा राज्यात आम आदमी पार्टी सातत्याने काम करत आहे. आम्ही राज्यातील सर्व ९० मतदारसंघात निवडणूक लढवण्यास तयार आहोत. पण आघाडीबाबत कोणताही निष्कर्ष आताच काढता येणार नाही.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार दि. ८ सप्टेंबर २०२४



# गणपती बाप्पाची आरती आपले रक्षण करणाऱ्या पोलीस बांधवांच्या हस्ते करा –आदर्श जाधव



बीड : तमाम गणपती मंडळांना महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटना चे मराठवाडा अध्यक्ष यू.आ . आदर्श जाधव यांनी आव्हान व विनंती करण्यात आली की, यावर्षीची गणेश उत्सवाची आरती ही आपल्या रक्षणकर्त्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या हस्ते करण्यात यावी गणेश मंडळ उत्सवाची आरती ११ दिवस म्हणजे २२ वेळा होते त्यातील एका आरती चा मान हा आपल्या मंडळा समोर दिवस रात्र पहारा देणारे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना द्यावा. यामागील उद्देश असा की त्यांना हा गणेशोत्सव त्यांचा कर्तव्यामुळे त्यांचा परिवार सोबत घरी साजरा करता येत नाही.यामुळे आपल्या सर्व गणेश मंडळाने त्यांना आरती चा मान देऊन पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना या उत्सवात सहभागी करून त्यांचा आनंद द्विगुणित होईल. व त्यांचा गणेश मंडळाने सन्मान केल्यासारखे होईल.असे प्रसिध्दी द्वारे पोलीस बॉईज संघटना संस्थापक अध्यक्ष राहुल भैया दुबाले यांचा मार्गदर्शनाखाली आदर्श अरुणराव जाधव (मराठवाडा अध्यक्ष युवक आघाडी) यांनी केले आहे.

# आरोग्यासाठी घातक असल्याला अल्पाझोलम औषधांचा आठ लाखांचा साठा जप्त

**जालना । प्रतिनिधी**

आरोग्यास घातक अल्पाझोलम प्रतिबंधीत गुंगीकारक औषधे व टॅबलेट (बटन गोळ्या) विक्रीसाठी बाळगणाऱ्या ४ आरोपींच्या ताब्यातुन ८ लाख १८ हजार ४०० रुपये किंमतीच्या गोळ्यांचा अवैध साठा जालना स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी जप्त केला आहे. या गोळ्यांचा तरुणांमध्ये अधिक प्रमाणात वापर होत असल्याचे दिसून येत आहे.

जालना जिल्ह्यात मानवी आरोग्य घातक असलेले व एनडीपीसी घटक प्रतिबंधीत असलेले गुंगीकारक औषधी व टॅबलेट (गोळ्या) विक्री करणाऱ्या इसमांची माहिती घेऊन कारवाई करण्याबाबत पोलीस अधिक्षक अजय कुमार बंसल, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव व पथकास सुचना दिल्या होत्या. ६ सप्टेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार यांना आरोपी अल्तमश ऊर्फ अलमश शेख निसार शेख हा भोकरदन नाका परिसरात अल्पाझोलम



हा प्रतिबंधीत घटक असलेल्या गोळ्या विक्री करीत असल्याची माहिती प्राप्त झाली होती. त्यावरुन स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पंच व अन्न व औषधी प्रशासन विभागाचे अधिकारी यांच्यासह छापा कारवाई टाकला आणि अल्तमश शेख याच्या ताब्यातुन एर्दैर्दे–०५.५० या कंपनीच्या गोळ्यांचे ७ हजार १२० रुपये किंमतीची पाकीटे जप्त करण्यात आले आहे. त्यास गोळ्यांचा पुरवठा करणारे संतोष बालासाहेब जाधव, राहुल भागाजी गायकवाड (विराज मेडीकल) यांना ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्यांना सदरच्या गोळया उध्दव शिवाजी पटारे रा.सोमनाथ जळगाव ता.जि. जालना ह.मु सनसिटी जालना हा पुरवठा करीत असल्याचे सांगितल्याने सदर इसमाचा शोध घेतला असता त्याला त्याला ताब्यात घेण्यात आले आहे. तसेच त्याने गुन्ह्याची कबुली दिली आहे.

नमुद आरोपीतांचे ताब्यातुन ८ लाख १८ हजार ४०० किंमतीच्या नशेच्या गर्भपाताच्या व उत्तेजक गोळ्यांचे पाकीटे अन्न औषध निरीक्षक वर्षा महाजन यांच्या उपस्थितीत जप्त करण्यात आला आहे. आरोपी अल्तमश ऊर्फ अलमश शेख निसार शेख, संतोष बालासाहेब जाधव, राहुल भागाजी गायकवाड, उध्दव शिवाजी पटारे या इसमांविरुध्द पोलीस ठाणे सदर बाजार जालना येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणातील दोषी असलेल्या मेडीकल व्यवसायिक यांच्या मेडीकल दुकानांचे परवाने रद्द करण्यासाठी संबंधित विभागास प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे. सदरची कारवाई ही पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल, अपर पोलीस अधीक्षक , उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सहायक पोलीस निरीक्षक योगेश उबाळे, पोलीस अमंलदार रुस्तुम जैवाळ, कैलास खार्डे, जगदीश बावणे, फुलचंद हजारे, भाऊराव गायके, विजय डिक्कर, रमेश राठोड, प्रशांत लोखंडे, सागर बावीस्कर, इरशाद पटेल, अक्रूर धांडगे सागर बावीस्कर, इरशाद पटेल, अक्रूर धांडगे, मपोना/चंद्रकला शडमल्लु, संदीप चिंचोले, किशोर पुंगळे, सचीन राऊत, योगेश सहाणे, सोपान क्षीरसागर, रमेश काळे व चालक गणपत पवार, रमेश पैठणे सर्व स्थानिक गुन्हे शाखा यांनी केली आहे.

# वाचन चळवळ जोपासली तरच समाजाची उन्नती शक्य –प्रा.डॉ.विठ्ठल जायभाये

**शिरूर कासार । प्रतिनिधी**

विविध समाजमाध्यमांच्या अतिरेकी प्रभावामुळे वाचनसंस्कृतीचा र्हास होत चालला असून पुस्तके विकत घेऊन वाचने ही प्रथा धोक्यात आलेली आहे. पुर्वजांनी सांगितलेल्या 'पुस्तकाने मस्तक घडते' याविधानावर दृढ विश्वास ठेवत वाचन चळवळीचे पुनरूज्जीवन केले तर समाजाची झपाट्याने प्रगती झाल्याशिवाय राहणार नाही असे प्रतिपादन परभणी येथील लेखक ह.भ.प.प्रा.डॉ.विठ्ठल जायभाये यांनी केले. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त एकता फाउंडेशन च्या वतीने आयोजित २५ वे राज्यस्तरीय रौप्य महोत्सवी ऑनलाईन एकता काव्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून ते बोलत होते. अंबाजोगाई येथील जेष्ठ साहित्यिक राजेंद्र रापतवार यांनी संमेलनाचे उद्घाटन करत श्रोत्यांना मार्गदर्शनही केले.



एकताचे संस्थापक अध्यक्ष साहित्यिक अनंत कराड, मार्गदर्शक कथाकार प्रा.डॉ.भास्कर बडे, प्रदेश संघटक देवीदास शिंदे, मराठवाडा विभागीय अध्यक्ष प्रा.डॉ.प्रकाश वाकळे, परभणी महानगरीय अध्यक्षा प्रा.शोभाताई घुंगरे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. पाठ्यपुस्तकातील कवी शंकर कसबे (तुळजापूर) यांनी 'हे झाड सावलीचे' व 'चळवळी' या गझलसदृष्य रचना सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. यानंतर बीडचे गझलकार श्रीराम गिरी यांनी मतला, शेर यांसह 'काटा रूतला' व 'प्रेम तर केले पण सांगायचे कोणी' या दर्जेदार गझला रसिकांसमोर पेश केल्या. गौरी देशमुख (माजलगाव) यांच्या 'मी पुन्हा येईन' व 'मी शिक्षक' या समयोचित रचनांनी रसिकांना खिळवून ठेवले. अंबाजोगाई येथील कवयित्री अर्चना स्वामी यांनी 'डोरेमॉन' व 'फक्त एकच गुन्हा झाला' कविता सादर केल्या. पुण्याच्या सुरेखा कानडे यांनी 'कशी आहे मी' व 'हे बघ तुझ्या समोर उभी आहे' या स्त्रीवादी कवितांतून महिलांच्या समस्यांना वाचा फोडली. सुरेखा खेडकर (पाटोदा) यांच्या चारोळ्या व 'एक सूर्य' या काव्याने धमाल उडवून दिली. उद्घाटक रापतवार यांनी 'शून्य' रचना रसिकांना ऐकवली. तब्बल सव्वादोन तास चाललेल्या या काव्य संमेलनाचे बहारदार सूत्रसंचालन परळी वैजनाथ येथील शाहीर अनंत मुंडे यांनी केले. एकताचे प्रवक्ते मल्हारी खेडकर यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना तर युवक प्रदेश सरचिटणीस बलराम मनिठे यांनी आभार प्रदर्शन केले. यावेळी एकताच्या परभणी जिल्हा उपाध्यक्षा मेघा नांदखेडकर, एकता चे पैठण तालुकाध्यक्ष शहादेव सुरासे, विद्यार्थी आघाडी शिरूर कासार चे प्रतिनिधी कार्तिक कांबळे यांच्यासह केंद्रीय कार्यकारिणीतील पदाधिकारी, विविध जिल्ह्यांतील एकताचे सभासद आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# इनरव्हिल क्लब ऑफ अंबाजोगाईचा आदर्श शिक्षक पुरस्कार सन्मान सोहळा

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

५ सप्टेंबर शिक्षक दिनाचे औचित्य साधून इनरव्हील क्लबच्या वतीने अंबाजोगाई परिसरात कार्यरत असणाऱ्या व आपल्या ज्ञानदानाच्या पवित्र कार्याने अनेक विद्यार्थ्यांच्या आयुष्यात नंदनवन फुलविणाऱ्या शिक्षकांचा हृद्य सत्कार करण्यात आला.




या पुरस्कार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी इनरव्हील क्लब अंबाजोगाई शाखेच्या अध्यक्षा सुरेखा सिरसट/खंडाळे तर प्रमुख अतिथी म्हणून स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रा.डॉ.सुनिताताई बिराजदार या होत्या. यावेळी पुढील शिक्षकांना मान्यवरांच्या हस्ते आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. यात श्रीमती पुष्पाताई बगाडे /गवळी (माजी मुख्याध्यापिका, गोदावरी कुंकुलोळ विद्यालय, अंबाजोगाई), श्री.शिवकुमारजी निर्मळे (माजी मुख्याध्यापक, योगेश्वरी मुलांचे विद्यालय अंबाजोगाई.), श्रीमती शशिकलाताई काकडे (मुख्याध्यापिका, गुरूदेव विद्यालय, मोरेवाडी), श्रीमती आलिया सिद्दिकी (सोमेश्वर विद्यालय उर्दू प्राथमिक शाळा मगरवाडी), डॉ.सुनिता सिध्देश्वर बिराजदार (स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई), श्री.महादेव साळुंके (शंकर विद्यालय, घाटनांदूर), श्रीमती अनिता चौधरी (कर्तव्य मतिमंद निवासी मुलींची शाळा , अंबाजोगाई.), श्री.गणेश तौर (जि.प.प्रा.शाळा, घाटेवाडी), श्रीमती.मंदाकिनी चव्हाण (जि.प.प्रा.शाळा, साळुंकवाडी) यांचा समावेश आहे. प्रास्ताविक करताना अध्यक्षा सुरेखा सिरसट यांनी शिक्षक हा देशाच्या विकासाचे केंद्रबिंदू आहे त्यामुळे त्याला समाजात आणि आपल्या परंपरेत अगदी परमेश्वराचे स्थान दिले आहे. या घटकाचा सन्मान व्हावा आणि त्यांना नवी ऊर्जा मिळावी या करिता कार्यक्रमाचे आयोजन केल्याची माहिती दिली. यावेळी बोलताना प्रमुख पाहुण्या डॉ.सुनीता बिराजदार यांनी विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत शिक्षक हा महत्वाचा घटक असतो म्हणून विद्यार्थ्यांना घडविण्यात परिणामी राष्ट्र उभारणीत समाज उभारणीत शिक्षक हा महत्वाचा घटक असल्याचे अधोरेखित करत शिक्षकांची भूमिका नेहमी सकारात्मक असावी अशी अपेक्षा व्यक्त केली. इनरव्हील क्लबने शिक्षक दिनाचे औचित्य साधून अत्यंत कौतुकास्पद उपक्रम ठेवल्याचा उल्लेख ही त्यांनी यावेळी केला. यावेळी पुरस्कार प्राप्त शिक्षकांनीही समायोचित मार्गदर्शन केले. यावेळी इनरव्हिल क्लब मधील सदस्य शिक्षिकांचा ही सन्मानपत्र देवून सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रेखा तळणीकर तर उपस्थितांचे आभार वर्षा देशमुख यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संगिता नावंदर, कल्पना शिंदे, जयश्री कराड, जयश्री लव्हारे, सुरेखा कचरे, रेखा शितोळे, चंद्रकला देशमुख, अनिता फड, प्रा.तन्वी कमळकर, वासंती बाबजे यांनी परिश्रम घेतले.

# प्रतिकुल परस्थितीवर मात करीत मंगलची पोलीस दलात निवड



**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील छोटेवाडी (रामगांव) येथील मंगल गंगाधर गायकवाड हिची ठाणे शहर पोलीस दलामध्ये निवड झाल्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने मंगलची गावातुन वाजत गाजत मिरवणुक काढुन तीचे विशेष अभिनंदन करण्यात आले. छोट्या खेड्यातील सामान्य कुटुंबातील मुलगी आज कायद्याच्या रक्षणासाठी पोलिस दलात दाखल होत, देशाची सेवा करणार यामुळे गावकऱ्यांमधून आनंद व्यक्त करत मंगल गायकवाड व तीची मैत्रीण पुजा वाघमोडे या दोघींचा सत्कार गावकऱ्यांच्या वतीने सरपंचांनी केला.

''मुलगी शिकली प्रगती झाली'' या संकल्पनेतून मंगल गायकवाड परिवारासाठी आनंदाची पर्वणी ठरली आहे.मंगलचे वडील गंगाधर गायकवाड हे मोलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. मंगल हिने शिक्षण घेऊन पोलिस दलात भरती होण्यासाठी कमांडो अकॅडमी बीड या ठिकाणी प्रशिक्षण घेतले होते.अकॅडमीचे मुख्य मार्गदर्शक परमेश्वर गिराम यांनी तिच्या यशासाठी विशेष प्रयत्न केले.

यावेळी ग्रुप ग्रामपंचायत छोटेवाडी/रामनगरच्या सरपंच सविता अंगदराव कटके, गावातील मित्र परिवार व समस्त ग्रामस्थांनी मंगल गायकवाड व तिच्या सोबत पोलीस दलात निवड झालेल्या माजलगाव येथील पुजा गोरख वाघमोडे या दोघींचा सत्कार मोठ्या उत्साहाने करण्यात आला. तसेच या दोघींचे अभिनंदन करून पुढील आयुष्यासाठी गावकऱ्यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

पान ६ वरून...

## राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार

करू असे आश्वासन दिले या प्रवेशामुळे क्षीरसागर यांचे सर्व स्तरातून स्वागत होत असून आपण एकनिष्ठ पणे आमदार सोळंके यांच्या नेतृत्वाखाली काम करून पक्षाला बळकटी देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे यावेळी आश्वासन दिले. त्यांच्या या जाण्यामुळे शरद पवार गटाचे नुकसान झाले आहे.

अजित पवार गट यांच्या पक्षा मध्ये जाहिर प्रवेश क्षीरसागर यांच्यासोबत रामा सातपुते, दिना कांबळे गोविंद थोरात गोपिनाथ क्षिरसागर रामा गायकवाड, विश्वाम क्षीरसागर भिमराव कांबळे, नितीन क्षीरसागर, सुग्रीव कांबळे, वैभव क्षिरसागर प्रभाकर थोरात चिकू सातपुते, सुमित क्षिरसागर, रामा कांबळे, भारत कांबळे तोफिक लाला, पाशा भाई सुलतान, सचिन कांबळे यांच्यासह बहुसंख्य कार्यकर्ते हजर होते.

## दत्तप्रसादआजमेरा यांच्या

न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठात याचीका दाखल केली. या प्रकरणात दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकूण न्यायमुर्ती एस.जी.चपळगावकर यांनी विभागीय सहनिबंधक लातूर यांचे आपील क्रमांक ०२/२३ प्रकरणामध्ये दि. ३१/०७/२०२४ च्या आदेशास स्थगिती दिली आहे. त्यामुळे रांदड कुटूंबियांना मोठा दिलासा मिळाला आहे. या प्रकरणातील दत्तप्रसाद आजमेरा यांना मोठा झटका बसल्याचे बोलल्या जात आहे. रांदड यांच्या वतीने बीड व लातूर येथील ॲड.व्ही.डी.शिंदे, ॲड.वांगजीकर व खंडपीठामध्ये ॲड.आनंद भडारी, ॲड.ऋषीकेश तोतला यांनी काम पाहिले.

## शिवसेना कामगार मेळावा

लावलेले भगवे झेंडे व फलक यामुळे अंबाजोगाईत भगवेमय वातावरण झाले असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मागील काही दिवसांपासून घेतलेले माझी बहिण लाडकी बहिण योजने सारखे निर्णय या मुळे शहरात शिवसेने कडे नविन तरुणांचा ओढा वाढला आहे आगामी काळातील निवडणुकीत नक्कीच याचा फायदा होईल असे वाटते

## घोंगडी बैठकीस हजारोंच्या

मतदार संघाची भव्य दिव्य अशी घोंगडी बैठक मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज दादा जरांगे पाटील यांच्या उपस्थितीमध्ये संपन्न होणार आहे. मराठा संघर्ष योद्धा मनोज जारंगे पाटील गेल्या एक वर्षापासून मराठा आरक्षणाचा लढा लढत आहेत. सरकारने लगेच सगेसोयऱ्याची अंमलबजावणी न केल्यामुळे आपण येणाऱ्या काळामध्ये लोकसभेप्रमाणे उमेदवार पाडणार की उभे करणार यावरही आपली भूमिका यामधून स्पष्ट करणार आहेत. तरी या बैठकीस परळी विधानसभा मतदार संघातील मराठा बांधवांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन परळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा मराठा सेवक अमित घाडगे पाटील यांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

## पांगलेली मन जोडणे, विस्कटलेली

श्रवणाचा लाभ मिळणार आहे ,किमान २५१ दाते रक्तदान करणार असे उद्दिष्ट ठेवले आहे , सीसीटाव्ही यंत्रणा ,आग रोधक यंत्रणा, महिलासाठी खेळ पैठणीचा आयोजीत केला तर शालेय विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी निबंध ,वकृत्व व रांगोळी स्पर्धा घेण्यात येणार उत्सव काळात ऐतिहासिक देखावे सादर केली जाणार आणि गणपती विसर्जन मिरवणूकित डी . जे .ला फाटा देऊन पारंपारीक वाद्य आणि महिलांचे ढोलपथक असणार अशी माहिती आयोजक मंडळाकडून देण्यात आली .कायदा सुव्यवस्था अबाधीत ठेऊन भक्तिभाव हा जोपासला जाणार आहे .या मोठ्या गणपती मंडळाचे अध्यक्षपद सर्वसामान्य गणेश भक्ताला दिले जाऊन सर्वजन एकदिलाने हा उत्सव साजरा करून महाराष्ट्रात शिरूर तालुक्याची एक नवी ओळख दाखवणार असल्याचा संकल्प केला आहे .

शहरात भव्य स्वागत कमाणी आणि गणपतीची तेरा फुटी भव्य मुर्ती मंडळाचे आकर्षण आहे . महिलासाठी दर्शन व देखावा पहाण्यासाठी स्वतंत्र सुविधा करण्यात येणार आहे.

# ८० बस कोकणात पाठवल्यामुळे लांब पल्ल्याच्या प्रवासी वाहतुकीवर परिणाम

**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातून अंबड परतुर जालना जाफराबाद या चार डेपो मार्फत कोकणामध्ये ७० ते ८० बसेस सोडण्यात आल्यामुळे लांब रूट च्या बस बंद केल्यामुळे प्रवासाची हाल होत आहे.




राज्य परिवहन महामंडळाच्या बस कोकणात गणेश उत्सवसाठी रवाना करण्यात आल्या आहेत. जालना ,अंबड, जाफराबाद, परतुर, आगारातून लांब पल्ल्याच्या बस सेवा बंद ठेवण्यात आल्यामुळे प्रवाशांची मात्र चांगली तारांबळ उडाली आहे. गणपती व महालक्ष्मी सण असल्यामुळे आपल्या गावी जाण्यासाठी नागरिकांना जाण्यासाठी सरकारी कर्मचारी व खाजगी कर्मचारी तसेच कंपनीतील नागरिक ,महिला यांना जास्तीचे भाडे देऊन खाजगी वाहनांचा प्रवास करावा लागत आहे

गौरी गणपती उत्सवासाठी मुंबई मधून मोठ्या प्रमाणावर हा उत्सव साजरा करण्यासाठी कोकणवासी आपल्या गावाकडे जातात. या प्रवाशांच्या सोयीसाठी राज्य परिवहन महामंडळाच्या माध्यमातून विशेष बस कोकणवासीयांसाठी सोडल्या गेल्या आहेत. जालना जिल्ह्यातील चार डेपोतून लांब पल्ल्याची बस सेवा बंद करून ७० ते ८० बस कोकणात उत्सवसाठी पाठवण्यात आल्या.

अंबड परतुर जाफराबाद जालना आगारातून दररोज जाणाऱ्या मुंबई, बुलढाणा, पुणे सोलापूर, शेगाव, बारामती पनवेल, धुळे, अकोला, अमरावती, यास अनेक बस बंद करण्यात आले आहे. तरी प्रवाशाना आपापली व्यवस्था करून प्रवास करावे तसेच दि.५ सप्टेंबर पासून गणपती विसर्जन पर्यंत बंद राहतील. असे आवाहन बस व्यवस्थापक यांच्याकडून करण्यात येत आहे. तसेच नाशिक, परभणी, धुळे, शिर्डी, कोपरगाव येथे जाणाऱ्या बस सेवा बंद ठेवण्यात आल्या आहे. याचीही नोंद प्रवासाने घ्यावी

------

# वाजतगाजत मोठ्या उत्साहात विविध गणेश मंडळाकडून गणरायाची स्थापना

**किल्लेधारूर । प्रतिनिधी**

धारूर तालुक्यात ६५ परवानाधारक गणेश मंडळाची स्थापना करण्यात आली आहे विविध गणेश मंडळांनी आज गाजतवाजत गणरायाची मिरवणूक आनंदी व उत्साही वातावरणात काढून विधिवत स्थापना केली.

धूमधडाक्यात गणेश उत्सव साजरा करताना पर्यावरण राखणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. प्लॅस्टर ऑफ पॅरिसची मूर्ती वापरू नये, ती विरघळण्यास वेळ लागतो. त्यामुळे पर्यावरणाची हानी होत असून ते पर्यावरणाला घातक आहे त्यासाठी जनजागृती व्हावी म्हणून धारूर येथील नावलौकिक जय किसान गणेश

## जय किसान गणेश मंडळाच्या वतीने पर्यावरण पूरक गणेशाच्या मूर्तीची स्थापना

मंडळाने पर्यावरण पूरक गणेश मूर्ती करून एक पर्यावरणाचा संदेश दिला आहे

धारूर तालुक्यात ६५ गणेश मंडळाने यावर्षी पोलीस प्रशासनाकडून परवाने घेऊन गणेशाची स्थापना केली आहे तालुक्यात मोठ्या उत्साहात दरवर्षी गणेशोत्सव साजरा केला जातो.सकाळ पासूनच लहान बालके जेष्ठांनी गणेशाची मूर्ती घेण्यास गर्दी केली होती यामुळे बाजार परिसर गजबजला होता.शहरात विविध सामाजिक कार्यक्रम राबिविणारे मोठे गणेश मंडळ आहेत सलग दहा दिवस सामाजिक कार्यक्रम आयोजित करून गणेशोत्सव साजरा केला जातो येथील जय किसान गणेश मंडळाच्या वतींने माघील तीन वर्षांपासून पर्यावरण पूरक गणेशाची मूर्ती बसविले जाते.तसेच शहरात जय हनुमान गणेश मंडळ,शिवगर्जना गणेश मंडळ,शिवशंकर गणेश मंडळ,नाथ नगरचा राज गणेश मंडळ आशा अनेक नावाजलेल्या गणेश मंडळाने मोठ्या उत्साहात ढोल पथक लेहजीम खेळत आनंदाने गणपती आणत गणेशाची स्थापना केली.

# शिक्षक दिनानिमित्त अंबाजोगाई पिपल्स बॅंकेच्या वतीने शहरातील शिक्षकांचा सन्मान

अंबाजोगाई । प्रतिनिधी

भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जयंती दिन हा देशभर शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. याच शिक्षक दिनाचे औचित्य साधून अंबाजोगाई शहरातील नागरिकांच्या अतिशय जिव्हाळ्याची अशी ठरलेली अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेच्या वतीने शहरातील सर्व शाळेत जाऊन तेथील शिक्षक बांधवांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. बँकेचे संस्थापक राजकिशोर मोदी व मुख्य कार्यकारी अधिकारी धनंजय देशपांडे यांच्या संकल्पनेनुसार बँकेच्या सर्व कर्मचाऱ्यांच्या वतीने शिक्षकांचा सन्मान व सत्कार करण्यात आला.



५ सप्टेंबर डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जयंतीचा दिवस हा संपूर्ण देशभर शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. काळ्या फळ्यावर पांढऱ्या खडूनी जीवनाचे सार शिकवण्याचे काम शाळेतील शिक्षक करतात. आयुष्याला आकार देत अमर्याद ज्ञान देणाऱ्या शिक्षकांना आपण आयुष्यात आईच्या नंतर शिक्षकाना गुरुस्थानी ठेवतो. त्यामुळेच आपण गुरूला सर्वोच्च सन्मान असा सन्मान देखील देतो. याच गुरूंचा छोटासा सन्मान करण्याचा कार्यक्रम अंबाजोगाई पिपल्स बँकेचे संस्थापक राजकिशोर मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली बँकेच्या कर्मचारी बांधवांच्या वतीने आयोजित केला गेला. अंबाजोगाई शहरातील श्री योगेश्वरी प्राथमिक विद्यालय, खोलेश्वर विद्यालय, संकल्प विद्या मंदिर, भालचंद्र प्रा विद्यालय, जिजाऊ विद्यालय, जी प प्रशाळा मोरेवाडी, दासोपंत विद्यालय, घाट नागनाथ माध्यमिक विद्यालय, मानव विकास मतिमंद व अपंग विद्यालय,जिजाई इंग्लिश स्कुल, जोधाप्रसादजी मोदी माध्यमिक विद्यालय, न्यू व्हिजन पब्लिक स्कुल, गुरुदेव माध्यमिक विद्यालय या व इतर शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचा सन्मान करण्यात आला. शाळेतील शिक्षक हे आपल्या अध्यापनाद्वारे देशाची पिढी घडवत असतो. या घडलेल्या पुढीमुळेच देश सामाजिक, आर्थिक ,राजकिय प्रगती करत आहे. त्यामुळे देशाची उज्वल पिढी घडवणाऱ्या शाळेतील शिक्षकांच्या प्रति देखील आपले सामाजिक उत्तरदायित्व ठरत असल्याने अंबाजोगाई पिपल्स बँकेचे अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी या शिक्षकांप्रति आपण उतराई व्हावे या भावनेतून अंबाजोगाई शहरातील शिक्षकांचा सन्मान करण्याचे ठरवले. आज शिक्षक दिनाचे औचित्य साधून बँकेतील सर्व कर्मचाऱ्यांच्या हस्ते शाळेतील शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. यावेळी अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेचे शाखा व्यवस्थापक राजेंद्र कांबळे, शरद ससाणे, मकरंद आंबेकर, राहुल इंगळे, श्रीकांत लखेरा, दीपाली कुलकर्णी, उत्कर्षा पंढरपूरकर , वैशाली रांजणकर, रवी जोगदंड, उदयसिंह लोमटे, नरसिंग देशमुख , रविंद्र देशपांडे आदी बँकेचे कर्मचारी सहभागी झाले होते.

cmyk



# शेतकऱ्यांना केंद्र सरकार दरमहा ३००० रुपये पेन्शन देणार

नवी दिल्ली : प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेद्वारे केंद्र सरकार पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात तीन हप्त्यांमध्ये सहा हजार रुपये पाठवतं. आतापर्यंत १७ हप्त्यांची रक्कम म्हणजेच ३४ हजार रुपये शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये पाठवण्यात आले आहेत. पीएम किसान सन्मान योजनेप्रमाणं प्रधानमंत्री किसान मानधन योजना देखील शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची आहे. पीएम किसान मानधन योजनेद्वारे शेतकऱ्यांना वयाच्या ६० वर्षांनंतर दरमहा ३ हजार रुपये पेन्शन मिळणार आहे. ही योजना नेमकी काय? या योजनेच्या अटी कोणत्या, योजनेचा लाभ घेण्यासाठी काय करावं लागते हे जाणून घेणार आहोत.

पीएम किसान मानधन योजना नेमकी काय?

पीएम किसान मानधन योजनेद्वारे शेतकऱ्यांना वयाच्या ६० वर्षांनंतर दरमहा तीन हजार रुपये पेन्शनच्या स्वरुपात दिले जातात. ही योजना ऐच्छिक असून यामध्ये शेतकऱ्यांना ५५ ते २०० रुपये जमा करावे लागतात. वयाची ६० वर्ष पूर्ण झाल्यानंतर शेतकऱ्यांना दरमहा ३ हजार रुपये




मिळतात. नागरी सुविधा केंद्रातून किंवा राज्य नोडल ऑफिसर यांच्याकडून या योजनेसाठी मोफत नोंदणी करता येते. १८ ते ४० वर्षांच्या दरम्यान वय असणाऱ्या शेतकऱ्यांना ६० वर्ष पूर्ण होईपर्यंत ५५ ते २०० रुपयांचा प्रिमियम भरावा लागेल. केंद्र सरकार देखील या योजनेत शेतकऱ्यांच्या सोबत पैसे जमा करेल.

या योजनेसाठी अर्ज करणाऱ्या शेतकऱ्यांकडे २ हेक्टर पेक्षा कमी शेती असणं आवश्यक आहे. शासकीय आकडेवारीनुसार या योजनेसाठी २० लाखांहून अधिक शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे.

पीएम किसानचा १८ वा हप्ता कधी मिळणार?

पीएम किसान योजनेतून शेतकऱ्यांना वर्षाला ६ हजार रुपये मिळतात. पीएम किसान सन्मान योजनेद्वारे आतापर्यंत शेतकऱ्यांच्या खात्यावर १७ हप्त्यांची रक्कम जमा करण्यात आलेली आहे. पीएम किसान सन्मान योजनेचा १८ हप्ता ऑक्टोबर महिन्यात शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा केला जाण्याची शक्यता आहे. पीएम किसान योजनेचे सहा हजार रुपये तीन हप्त्यांमध्ये शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग केले जातात. दरम्यान, महाराष्ट्र सरकारनं नमो किसान महासन्मान योजना सुरु केली असून पीएम किसान सन्मान योजनेप्रमाणं राज्य सरकार देखील शेतकऱ्यांच्या खात्यावर सहा हजार रुपये जमा करतं. आतापर्यंत चार हप्त्यांची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात आली आहे. म्हणजेच महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना वार्षिक १२ हजार रुपये मिळतात.




## एक वर्षात नमो शेतकरी महासन्मान योजनेत २० लाख ५० हजार लाभार्थींची वाढ

केंद्र सरकारच्या अत्यंत महत्त्वाकांक्षी असलेल्या पीएम किसान सन्मान योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दरवर्षी ६ हजार रुपये तर यावर्षीपासून राज्य शासनाने सुरू केलेल्या नमो शेतकरी महासन्मान योजनेतून ६ हजार रुपये असे एकूण १२ हजार रुपये शेतकऱ्यांना दिले जातात. या योजनेत चौदाव्या हप्त्यापर्यंत ७० लाख लाभार्थी राज्यातून लाभ घेत होते. कृषी विभागाने विविध मोहिमा राबवत गेल्या एक वर्षामध्ये या योजनेमध्ये २० लाख ५० हजार लाभार्थ्यांची वाढ झाली आहे. पीएम किसान योजनेत राज्यातील ६५ हजार शेतकरी काही कागदपत्रांच्या किंवा ई- केवायसीच्या कारणावरून वंचित राहिले होते. याबाबत संबंधित ६५ हजार शेतकऱ्यांचा परिपूर्ण प्रस्ताव केंद्र सरकारकडे मान्यतेसाठी सादर केलेला आहे. दरम्यान, या योजनेमध्ये आणखी पात्र असलेल्या लाभार्थ्यांची वाढ व्हावी याबाबत राज्यस्तरावरून तसेच केंद्रस्तरावरून विविध मोहिमा वेळोवेळी राबविण्यात येत आहेत.

## शेतकऱ्यांनो पपई लागवडीसाठी ऑक्टोबर महिना सर्वोत्तम

फळशेतीच्या लागवडीतून शेतकरी चांगले उत्पादन घेत आहेत. सध्या पपई हे पीक चांगलेच चर्चेत आले आहे. पपई पिकातून शेतकरी भरघोस नफा मिळवत आहेत. जर तुम्हाला पपई लागवड करायची असेल तर ऑक्टोबर महिना तुमच्यासाठी सर्वोत्तम ठरेल. चांगले उत्पादन देखील घेता येईल.

पपई हे एक नगदी पीक आहे. पपई लागवड शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरू शकतात. ऑक्टोबर हा पपई लागवडीसाठी अनुकूल काळ आहे. उदाहरणार्थ, शेतकरी यावेळी शेतात पपईचे रोप लावू शकतात. मात्र अशावेळी पपईच्या रोपाचीही काळजी शेतकऱ्यांना घ्यावी लागते.

पपईची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी झाडाच्या मुळावर कुजण्याचा रोग अधिक त्रासदायक ठरतो. यासोबतच पपईच्या रिंग स्पॉटसारख्या आजारांपासून बचाव करणे खूप कठीण होऊन बसते. शेतकऱ्यांनी यावर वेळीच पावले उचलली पाहिजेत, तरच त्याच्या व्यावसायिक लागवडीतून उत्पन्न मिळू शकेल.

अखिल भारतीय फळ प्रकल्प -आणि डॉ. राजेंद्र प्रसाद केंद्रीय कृषी विद्यापीठ, पुसा यांनी पपईच्या झाडाला रोगापासून संरक्षण देण्यासाठी एक तंत्र विकसित केले आहे. उभ्या पपई पिकातील विविध विषाणूजन्य रोगांचे व्यवस्थापन करण्यासाठी उपाययोजना सांगितल्या आहेत. उपाययोजना पपईचे रिंग स्पॉट विषाणू रोगापासून पपईचे संरक्षण करण्यासाठी ज्येष्ठ फळ शास्त्रज्ञ डॉ.एस.के.सिंग यांच्या मते, २% निंबोळी तेल ०.५ मिली प्रति लिटर स्टिकरमध्ये




मिसळून आठव्या महिन्यापर्यंत एक महिन्याच्या अंतराने फवारणी करा. उच्च प्रतीची फळे आणि पपईच्या झाडांमध्ये रोग-विरोधी गुणधर्म निर्माण करण्यासाठी युरिया ०४ ग्रॅम, झिंक सल्फेट ०४ ग्रॅम आणि विद्राव्य बोरॉन ४ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात विरघळवून पहिल्यापासून एक महिन्याच्या अंतराने फवारणी गरजेची आहे. महिना ते आठवा महिना. फवारणी करणे आवश्यक आहे. जनावरांचे दूध वाढवण्यासाठी शास्त्रज्ञांनी विकसित केला सर्वोत्तम आहार; १०० टक्के दूध उत्पादनात होणार वाढ फवारणीची वेळ : येष्ठ फळ शास्त्रज्ञ डॉ.एस.के.सिंग यांच्या मते या रसायनांची वेगवेगळ्या वेळी फवारणी करा. झिंक सल्फेट आणि बोरॉन एकत्र मिसळल्याने द्रावण घट्ट होते. त्यामुळे फवारणी करणे कठीण होते. पपईचा सर्वात घातक रोग, मुळांच्या कुजण्याच्या व्यवस्थापनासाठी, हेक्साकोनाझोल २ मिली प्रति लिटर पाण्यात विरघळवून एक महिन्याच्या अंतराने माती पूर्णपणे भिजवणे आवश्यक आहे. पहिल्या महिन्यापासून आठव्या महिन्यापर्यंत हे काम वरील द्रावणाने माती भिजवून करावे. सुरुवातीला ओले होण्यासाठी प्रति झाड फारच कमी औषध द्रावण आवश्यक आहे. वनस्पती जसजशी वाढते तस तसे द्रावणाचे प्रमाणही वाढते. सातव्या ते आठव्या महिन्यापर्यंत एक मोठी रोपे भिजवण्यासाठी ५-६ लिटर औषध द्रावण आवश्यक आहे.

## अनियमित पावसाच्या स्थितीतील आपत्कालीन पीक नियोजन

गेल्या काही वर्षापासून पावसाच्या अनियमितपणामध्ये कमालीची वाढ झाली आहे. कधी पाऊस वेळेवर आला तरी मध्येच मोठा खंड पडणे, पाऊस उशिरा सुरू होणे, लवकर संपणे, उशिरापर्यंत पडणे, अतिवृष्टी होणे अशा घटनांमुळे पिकांवर गंभीर परिणाम होतात. या वर्षीही पाऊस उशिरा आला आणि त्यातही मोठा खंड पडला आहे. अशा आपत्कालीन स्थितीत करावयाच्या उपाययोजनांची माहिती घेऊ.

महाराष्ट्रातील बहुतांशी शेती कोरडवाहू असून, जमीन, हवामान आणि पर्जन्यमानातील विविधतेप्रमाणे पिकांच्या प्रकारातही विविधता आढळते. प्रामुख्याने पावसाच्या लहरीपणामुळे बऱ्याचवेळा पिकांच्या दृष्टीने बिकट परिस्थिती निर्माण होत आहे. पावसात खंड हा सर्वसाधारणपणे जुलै-ऑगस्ट महिन्यात पडतो. पाऊस वेळेवर सुरू झाला, तर १५ जुलैपर्यंत खरीप हंगामातील सर्व पिके चांगली येतात. मात्र, १५ जुलैनंतर पावसामध्ये दोन ते चार आठवडे खंड पडला, तर पिकांची वाढ खुंटते आणि उत्पादनात घट येते.

पीक फुलोऱ्यात किंवा दाणे भरण्याच्या अवस्थेत दीर्घकाळ पावसाचा खंड असताना व्यवस्थापनामध्ये पुढील बाबींचा समावेश करावा. सोयाबीन पिकाला संरक्षित पाणी व पोटॅशिअम नायट्रेटची २ टक्के (म्हणजे २० ग्रॅम प्रति लिटर पाणी)प्रमाणे फवारणी करावी. कापूस पिकाला पोटॅशिअम नायट्रेट (१३:००:४५) या विद्राव्य खताची साधारणपणे १ टक्का (१० ग्रॅम प्रति लिटर पाणी) या प्रमाणे फवारणी करावी. या फवारणीमुळे पिकामध्ये पाण्याच्या संभाव्य ताणास प्रतिकार क्षमता वाढवते. सध्याच्या पावसाच्या खंड स्थितीमध्ये वारंवार डवरणी करून जमीन भुसभुशीत ठेवावी. त्यासाठी डवऱ्यांच्या जानकुळास दोरी



गुंडाळून पिकाच्या ओळीत चर काढावेत. त्यामुळे पडणारे पावसाचे पाणी जागेवरच मुरेल. शेततळे असल्यास जास्तीचे पाणी शेततळ्यात साचवावे. पावसाचे पाणी शेताबाहेर जाणार नाही याची काळजी घ्यावी. पाण्याची थोडीफार व्यवस्था असलेल्या शेतकऱ्यांनी ठिबक संच, तुषार सिंचन किवा एकआड एक सरी पद्धतीने संरक्षित ओलीत करावे. पिकाला संवेदनशील अवस्थेत (विशेषतः कपाशीला बोंडे भरण्याच्या अवस्थेत व सोयबीनला शेंगा भरण्याच्या अवस्थेत) पाण्याचा ताण पडणार नाही याची दक्षता घ्यावी. कापूस पिकाला खताची पूर्ण मात्रा जमिनीत पुरेसा ओलावा (२०० ते ३०० मि.मी. पाऊस) असल्याशिवाय देऊ नये. कापसाला पावसाचा खंड पडल्यास संरक्षित पाणी द्यावे. जर पाणी नसेल तर हलकी कोळपणी करावी. त्यामुळे तण नियंत्रणासोबतच जमिनीच्या भेगा बुजल्यामुळे जमिनीतील ओलावा उडून जाण्याचे प्रमाण कमी होते. पाऊस किवा सिंचनपश्चात पिकामध्ये पाण्याच्या ताणाची स्थिती सुधारल्यावर कापूस पिकामध्ये फुलोरा अवस्थेत युरिया (२ टक्के) व बोंडे धरण्याच्या/पोसण्याच्या अवस्थेत डीएपी (२ टक्के) प्रमाणे फवारणी फायदेशीर ठरते. सोयाबीन पिकामध्ये ५० व ७० दिवसांच्या पीक अवस्थेत २ टक्के युरियाची फवारणी किंवा शेंगा धरण्याच्या अवस्थेत विद्राव्य १९:१९:१९ ची २ टक्के प्रमाणे फवारणी केल्यास अधिक उत्पादन मिळण्यास मदत होते. कमी क्षेत्रावर लागवड केलेल्या किवा भाजीपाला पिकामध्ये ओलावा टिकवून ठेवण्यासाठी आच्छादनाचा (गव्हाचा भुस्सा, काडी कचरा/ धसकटे, वाळलेले गवत इ.) वापर करावा. यामुळे जमिनीतील ओलाव्याचे बाष्पीभवन कमी होण्यास मदत होते.

फळबागांचे आपत्कालीन नियोजन :

आच्छादनाचा वापर : बाष्पीभवनाने ओल उडून जाते. ही ओल टिकवून ठेवण्यासाठी सेंद्रीय पदार्थ उदा. उसाचे पाचट, गवताचे काड, लाकडाचा भुस्सा, पालापाचोळा या पदार्थांचे आच्छादन प्रत्येक झाडाच्या तंतूमय मुळ्या पसरलेल्या ठिकाणी करावे किंवा फळझाडाच्या आळ्यामध्ये सोयाबीन/गव्हाचा भुस्सा, वाळलेले गवत, गिरीपुष्प पाल्याचे आच्छादन करावे. फळबागेमध्ये बोर्डो पेस्टचा वापर करावा. सिंचनासाठी शक्यतो सूक्ष्म सिंचन पद्धतीचा अवलंब करावा.

पाण्याची फवारणी करावी : सायंकाळच्या वेळी शक्य असल्यास संपूर्ण झाडावर एक दिवसाआड पाण्याची फवारणी पंपाच्या साह्याने करावी. फळझाडे ताणावर असल्यास पानांचे तापमान वाढते. ते या फवारणीमुळे कमी होते. पानाद्वारे पाण्याने उत्सर्जनही कमी होते. झाडाच्या अंतरंगात गारवा निर्माण होतो. पानाची कर्बग्रहणाची क्रिया सुधारते.

फवारणीद्वारे खताचा वापर : दुष्काळी परिस्थितीत फळझाडाची तग धरून राहण्याची शक्ती किंवा ताण सहन करण्याची क्षमता वाढविण्यासाठी पानावर एक ते दीड टक्के पोटॅशिअम नायट्रेटची (१३:००:४५) फवारणी करावी.खरीप पिकाची पेरणी झाल्यावर ३० ते ४० दिवसांनी आंतरमशागतीचे कामे पूर्ण झाल्यावर उभ्या पिकात २, ४ किंवा ६ ओळीनंतर कोळप्याच्या साह्याने किवा बळीराम नांगराने सरी काढून घ्यावी. या सरीचा उपयोग ऑगस्ट, सप्टेंबर महिन्यातील पावसाचे पाणी यशस्वीरीत्या मुरविण्यासाठी होतो.




### महत्वाच्या घटना

१५४३ : नऊ महिने वयाची मेरी स्टुअर्ट ही स्कॉटलंडची राणी बनली.
१७७६ : अमेरीकेतोल कॉन्टिनेंटल काँग्रेसने ''औपचारिकरित्या 'सयुक्त वसाहती' हे नाव बदलून ''युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका'' असे ठेवले.
१७९१ : वॉशिंग्टन डी.सी हे शहर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन यांच्या नावावर ठेवण्यात आले.
१८३९ : जॉन हर्षेल याने जगातील पहिले छायाचित्र काचेच्या पट्टीवर घेतले.
१८५० : कॅलिफोर्निया हे अमेरिकेचे ३१ वे राज्य बनले.
१९२० : साली अलीगढ येथील एंग्लो ओरिएंटल महाविद्यालयाचे रुपांतर मुस्लिम विश्वविद्यालयात झाले.
१९३९ : मुंबईच्या 'सेंट्रल' सिनेमामधे 'प्रभात'चा 'माणूस' हा चित्रपट प्रदर्शित झाला. फिल्म जर्नलिस्टस असोसिएशनने १९३९ सालातील सर्वोत्कृष्ट चित्रपट असा बहुमान त्याला दिला.
१९४५ : दुसरे चीन जपान युद्ध जपानने चीनसमोर शरणागती पत्करली.
१९९० : श्रीलंकन सैन्याने बट्टिकलोआ येथे १८४ तामिळींची हत्या केली.
१९९१ : ताजिकिस्तानने आपण (सोविएत युनियनपासुन) स्वतंत्र असल्याचे घोषित केले.
१९९७ : सात वेळा राष्ट्रीय विजेतेपद मिळवलेल्या प्रवीण ठिपसे याला बुद्धिबळातील सर्वोच्च असा 'ग्रँडमास्टर' किताब देण्याची घोषणा जागतिक बुद्धिबळ महासंघाने केली.
१९८५ : मूकबधिर जलतरणपटू तारानाथ शेणॉय याने तिसर्यांदा इंग्लिश खाडी पोहून पार करुन विक्रम केला.
२००१ : व्हेनिस येथील आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात मीरा नायर दिग्दर्शित 'मॉन्सून वेडींग' या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा 'गोल्डन लायन' पुरस्कार मिळाला.
२००९ : ठीक ९ वाजुन ९ मिनिटे व ९ सेकंदांनी 'दुबई मेट्रो'चे उद्घाटन झाले.
२०१५ : एलिझाबेथ (दुसरी) युनायटेड किंग्डम वर सगळ्यात जास्त काळ राज्य करणारी राणी बनली.
२०१६ : उत्तर कोरियाने पाचवी अण्वस्त्र चाचणी पूर्ण केली आहे.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८२८ : लिओ टॉलस्टॉय रशियन लेखक (मृत्यू: २० नोव्हेंबर १९१०)
१८५० : भारतेंदू हरिश्चंद्र आधुनिक हिन्दी साहित्याचे जनक मानले जाणारे हिन्दी साहित्यिक, १८५० ते १९०० हा काळ हिन्दी साहित्यात 'भारतेंदू काळ' म्हणून ओळखला जातो. (मृत्यू: ६ जानेवारी १८८५)
१८७४ : प्रसिद्ध भारतीय ओडिया भाषिक लेखक आणि भाषातज्ञ गोपालचंद्र प्रहराज यांचा जन्मदिन.
१८९० : कर्नल सँडर्स 'केंटुकी फ्राईड चिकन' चे संस्थापक (मृत्यू: १६ डिसेंबर १९८०)
१९०४ : भारतीय-पाकिस्तानी हॉकी खेळाडू फिनोझ खान यांचा जन्म. (मृत्यू: २१ एप्रिल २००५)
१९०५ : भारतीय तत्त्वज्ञानी आणि कवी ब्रह्मारीश हुसैन शा यांचा जन्म. (मृत्यू: २४ सप्टेंबर १९८१)
१९०७ : साली राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार तसचं, सर्वोत्कृष्ट परराष्ट्रीय अकादमी पुरस्कार सन्मानित भारतीय चित्रपटसृष्टीतील एक प्रणेते निर्माता-दिग्दर्शक मेहबूब खान यांचा जन्मदिन.
१९०९ : लीला चिटणीस अभिनेत्री (मृत्यू: १४ जुलै २००३)
१९१० : नवलमल फिरोदिया गांधीवादी, स्वातंत्र्यसैनिक आणि उद्योगपती (मृत्यू: २६ मार्च १९९७)
१९३२ : प्रसिद्ध भारतीय हिंदी भाषिक रचनाकार कांती कुमार जैन यांचा जन्मदिन.
१९४१ : अबीद अली अष्टपैलू क्रिकेटपटू
१९५० : श्रीधर फडके संगीतकार
१९६७ : साली सुप्रसिद्ध भारतीय हिंदी चित्रपट अभिनेता, निर्माता, मार्शल आर्टिस्ट अक्षय कुमार यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१४३८ : एडवर्ड पोर्तुगालचा राजा (जन्म: ३१ आक्टोबर १३९१)
१९७६ : माओ त्से तुंग आधुनिक चीनचे शिल्पकार, मुत्सद्दी, मार्क्सवादी-लेनिनवादी विचारसरणीचे पुरस्कर्ते (जन्म: २६ डिसेंबर १८९३)
१९७८ : वॉर्नर ब्रदर्स चे सहस्थापक जॅक एल. वॉर्नर यांचे निधन. (जन्म: २ ऑगस्ट १८९२)
१९४७ : साली भारतातील सुविख्यात कलामर्मज्ञ तथा चिंतक आनंद कुमारस्वामी यांचे निधन.
१९४२ : स्वातंत्र्यसैनिक शिरीष कुमार यांचा गोळी लागून मृत्यू. (जन्म: २८ डिसेंबर १९२६)
१९६० : अली सिकंदर ऊर्फ 'जिगर मोरादाबादी' उर्दू कवी व शायर (जन्म: ६ एप्रिल १८९०)
१९९४ : सत्यभामाबाई पंढरपूरकर लावणीसम्राज्ञी (जन्म:)
१९९७ : आर. एस. भट 'युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया'चे पहिले अध्यक्ष (जन्म: )
१९९९ : पुरुषोत्तम दारव्हेकर नाटककार व लेखक (जन्म: १९२७)
२००१ : अफगणिस्तानचे उपराष्ट्राध्यक्ष व परराष्ट्रमंत्री अहमदशाह मसूद यांची हत्या (जन्म: २ सप्टेंबर १९५३)
२०१० : वसंत नीलकंठ गुप्ते समाजवादी कामगारनेते, लेखक व समाजवादाचे अभ्यासक (जन्म: ९ मे १९२८)
२०१२ : व्हर्गिस कुरियन भारतीय दुग्धोत्पादनातील 'धवल क्रांती'चे जनक, 'अमूल'चे संस्थापक, राष्ट्रीय दुग्धोद्योग विकास महामंडळाचे संस्थापक अध्यक्ष, पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण, रॅमन मॅगसेसे पारितोषिक विजेते (२६ नोव्हेंबर १९२१ कोहिकोड, केरळ)

cmyk

# हजरत शहंशावली दर्गाचा संदल उत्साहात

बीड । प्रतिनिधी

येथील हजरत शहेनशहावली (रहे.) यांच्या ऐतिहासीक उर्स सोहळा आज (दि.६ रोजी) संध्याकाळी पार पडला आहे. हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रतीक असलेल्या या उर्सला शेकडो वर्षांची परंपरा लाभली आहे. किला मैदान येथून संध्याकाळी ०५:०० वाजता नमाज ए असर नंतर किल्ला मैदान येथून बाबांच्या संदलची (चादर) सवाद्य मिरवणूक काढण्यात आली होती .तर रात्री दहा वाजता दर्गा येथे पोहोचेली होती. त्यानंतर संदल चढवले गेले.


दर वर्षी च्या परंपरे अनुसार ऑल महाराष्ट्र केजीएन ग्रूप च्या वतीने पोलिस अधिक्षक कार्यालय मधून संदल काढण्यात आले होते,पोलिस अधीक्षक कार्यालय मधून संदल निघून छत्रपती शिवाजी महाराज चौक, बशीर गंज,कारंजा,जुना बाजार, चांदणी चौकातून दर्गा हजरत शहनशावली रेह. पोहोचला. त्या नंतर अप्पर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उस्मान शेख, शहर पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बल्लाळ ,पेठ बीड पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अशोक मोदीराज व केजीएन ग्रूप चे संस्थापक अध्यक्ष सय्यद जहीर कादरी यांच्या हस्ते दर्ग्यावर चादर संदल फुल अर्पण करण्यात आले. त्याप्रसंगी केजीएन ग्रुपचे सर्व पदाधिकारी तसेच बीड येथील सर्वच नेत्यांनी दर्गाचा दर्शन घेतला आहे तसेच संदलनिमित्त बाहेरगावचे भाविक मोठ्या संख्येने दाखल झाले होते.



हजरत शहिंशाहवली रहे.संदल (ऊर्स) निमित्त आज गांधी नगर बीड येथे दोस्ती ग्रुप वतीने अन्नदानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमास शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांनी उपस्थित राहुन सर्व मुस्लिम बांधवांना रहे.संदल (उर्स ) च्या शुभेच्छा दिल्या. यावेळी पेठ बीड पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक मोदीराज,शहर प्रमुख शेख निजाम, मोठे साहेब,उपजिल्हाप्रमुख राजूभाऊ महूवाले, कामगार सेनेचे जिल्हाध्यक्ष रवी आण्णा वाघमारे, अल्पसंख्याक सेलचे जिल्हाध्यक्ष नय्युम भाई,खदीर भाई, विनोद गूंड पाटील, दिपक घोडके पाटील, अजय गायकवाड,कलीम भाई, वसीम भाई,पाशा भाई सह सर्व मुस्लिम बांधव उपस्थित होते.!!

हिंदू- मुस्लिम ऐकतेचे प्रतीक असलेल्या येथील उर्सने गावाचा सांस्कृतिक व धार्मिक वारसा जपला आहे. प्राचीन काळी हजरत शहेनशहावली (रहे.) यांचा हा दर्गा ऐतिहासीक दर्गा म्हणून ख्याती प्राप्त करुन आहे. बाबांचे नाव कोचक शहावली ऊर्फ हजरत शहेनशहावली (रहे.) असे आहे.हजरत शहेनशहावली १४ व्या शतकातील चिस्तीया जमातीपासून सुफी होते. ते मुहम्मद तुघलक च्या शासनकाळात बीड येथे आले. त्यांची कबर आणि आसपासची परिसरे १३८५ ते १८४० च्या विविध काळांत बांधण्यात आली. तपशील बीडच्या इतिहासात दिसून येतो. हे पूर्व उंचीवर वसलेले आहे. दरवर्षी एक उर्स (गोरा) येथे रबी अल-एव्हलच्या इस्लामिक कॅलेंडरच्या तिसर्या महिन्याच्या दुस-या दिवशी आयोजित आहे.दर्गा चारही बाजूंनी पाहिल्यावर दर्ग्याचा बांधकाम पुरातन दिसतो. हा दर्गा अतिशय कलाकुसरतेने बांधलेला असून त्याला लाकडाचा दरवाजा आहे. येथील उर्स उत्सवासाठी बीड येथील केजीएन ग्रुप व हिंदू-मुस्लिम पंच कमेटी व दर्गा कमेटीचे सहकार्य लाभले आहे .विशेष म्हणजे दर्गा परिसरात उर्सनिमित्त बाजार भरविला जातो. बाजारात विविध खाद्यपदार्थांपासून संसारोपयोगी वस्तू, मनोरंजनाची साधने दाखल झाली आहेत. या उर्स दरम्यान परिसरात उत्साहाचे व धार्मिक वातावरण निर्माण झाले आहे.दुसऱ्या दिवशी म्हणजेच दिनांक ०७ सप्टेंबर २०२४ शनिवारी रोजी पहाटे नमाज ए फजर नंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.याच दिवशी नमाज ए ईशा नंतर कव्वालीचा कार्यक्रम दर्गाह येथेच महफिल ए समा होणार आहे. आशी माहिती दर्गा कमिटीच्या वतीने देण्यात आली आहे.

# आहेरवडगाव येथे बैलगाडा शर्यतीचा थरार



बीड । प्रतिनिधी

बैलगाडा शर्यत महाराष्ट्रातील एक पारंपरिक क्रीडा प्रकार आहे. हौशी शेतकरी आपल्या बैलासह शर्यतीमध्ये आनंदाने भाग घेतात. ज्यामध्ये दोन बैलांचा एकजोड असलेल्या गाडीवर बसलेला शेतकरी त्यांना पळवून स्पर्धा करतो. ही शर्यत विशेषतः गावोगावी सण, उत्सव किंवा विशेष कार्यक्रमा दरम्यान घेतली जाते. बैलगाडी किंवा बैलगाडा हा ग्रामीण भागामध्ये हौशीचा विषय झाला आहे. पूर्वी बैल हा शेतीकामासाठी त्याचा वापर होयचा. परंतु आता बैलगाडा शर्यतीमध्ये आपला बैल स्पर्धेत टिकावा यासाठी पोटच्या मुलाप्रमाणे शेतकरी त्याच्यावर प्रेम दाखवत आहेत. अशाच स्पर्धा गावोगावी झाल्या पाहिजेत. बैलगाडा शर्यत आपल्या कृषी संस्कृतीची व ग्रामीण महाराष्ट्राची ओळख आहे. ती जोपासली पाहिजे असे मत भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी आहेरवडगाव येथे बैलगाडा शर्यत उद्घाटन पसंगी व्यक्त केले.

आज बीड विधानसभा मतदारसंघातील आहेर वडगाव येथे ग्रामस्थांच्या वतीने भव्य बैलगाडा शर्यतीचे आयोजन केले होते. या बैलगाडा शर्यतीत भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी सहभागी होत, बैलगाडा शर्यत, स्पर्धक व चालक - मालकांसोबत संवाद साधून त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी समवेत माजी पं.स.सदस्य लक्ष्मण काटे, सरपंच सुशांत खरसाडे, माजी सरपंच पोपट रोहिटे, माजी सरपंच वैजनाथ नेवाळे, माजी सरपंच बप्पासाहेब तावरे, विष्णु रोहिटे, उत्तम काटे, आत्माराम काटे, लक्ष्मण रोहिटे, रोहिटे सर, अनिल शेळके सह पंचक्रोशीतील नागरिक व बैलगाडा प्रेमी, शेतकरी बांधाव बहुसंख्येने उपस्थित होते.

## थोडक्यात



शिक्षक दिनानिमित्त आश्रम शाळा पोखरी येथे, दिला जाणारा दरवर्षीचा आदर्श शिक्षक पुरस्कार माध्यमिक विभागाच्या जावळे व प्राथमिक विभागाचे सहशिक्षक चव्हाण यांना दोन्ही मुख्याध्यापकाच्या तसेच सर्व स्टाफ मेंबर यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आले.या कार्यामुळे जावळे व चव्हाण यांचे गावकऱ्याकडून शुभेच्छांचा वर्षाव झाला. चव्हाण व जावळे यांनी सर्वांचे आभार मानले.




### श्री मत्स्योदरी देवीचा अभिषेक विजय चव्हाण यांच्या हस्ते

अंबड । प्रतिनिधी

६ सप्टेंबर शुक्रवार रोजी श्री मत्स्योदरी देवी संस्थान अंबड श्रावण मास २०२४ चा अभिषेक संस्थान अध्यक्ष तथा तहसीलदार श्री विजय चव्हाण आणि सौभाग्यवती श्रीमती सोनाली विजय चव्हाण यांच्या हस्ते संपन्न झाला. दर वर्षी प्रमाणे यावर्षी पण संपूर्ण एक महिना अभिषेक झाले. यावेळी अंबड शहरातील संस्थान आचार्य संतोष देवा दुधधारी, संस्थान पुजारी व विश्वस्त श्री गितविलास कुंठेफळकर यांच्या सोबत आठ पुरोहित उपस्थित होते. तसेच भाविक भक्त,व्यापारी व पत्रकार यांनी प्रसादाचा लाभ घेतला. यावेळी संस्थान व्यावस्थाक श्री कैलास शिंदे , नामदेव राठोड, गोविंद कायस्त, अर्जुन शिंदे , दिगांबर खरात, दळवे दाजी आणि एकनाथ महाराज खवळ उपस्थित होते.

### अध्यक्षपदी अनिल लगड यांची बहुमताने निवड

आष्टी : तालुक्यातील हिवरा गावचे सुपुत्र, ज्येष्ठ पत्रकार व अहमदनगर दै. सकाळचे अनिल लगड यांची अहमदनगर पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी निवड झाली. अत्यंत चुरशीने व खेळीमेळीच्या वातावरणात गुरुवारी पार पडलेल्या निवडणुकीत प्रोग्रेसिव्ह प्रेस फ्रंट (पीपीएफ) पॅनलचे १७ पैकी १४ उमेदवार निवडून आले. तर डेमॉक्रॅटिक मीडिया फ्रंटचे (डीएमएफ) तीन उमेदवार निवडून आले. दै. सार्वमतचे कार्यकारी संपादक अनंत पाटील यांनी निवडणूक अधिकारी म्हणून चोख काम बजावले. अनिल लगड हे गेल्या ३८ वर्षांपासून पत्रकारितेत कार्यरत आहेत. त्यांनी लोकमत, लोकयुग, सार्वमतमध्ये संपादकीय विभागात विविध पदावर आष्टी, अहमदनगर, बीड, श्रीरामपूर, कोपरगाव, छत्रपती संभाजीनगर येथे काम केले. सध्या ते अहमदनगर येथे सकाळमध्ये कार्यरत आहेत.





पाटोदा : पोलीस ठाण्याचे नवनियुक्त पोलीस निरीक्षक मा.सय्यदमजहरअली साहेब यांनी आपल्या पदाचा पदभार स्वीकारला या प्रसंगी त्यांचे स्वागत करतांना अड. जब्बार पठान, कीशोर आडागळे,रामेश्वर गोरे ,नगरसेवक वाघमारे, योगेश सानप, सतीश गर्जे, फयाज सय्यद

# बोगस राजपूत भामट्यांची चौकशी करण्याची मागणी

जालना । प्रतिनिधी

शासनाच्या वतीने २०२४ वैद्यकीय प्रवेश प्रक्रिया घेण्यात आली होती, यामध्ये विमुक्त जाती प्रवर्गात ३१२ भामटा राजपुतांनी घुसखोरी केल्यामुळे व या प्रक्रियेत सवर्ण आणि बिगर मागास असणार्या लोकांनी घुसखोरी केल्यामुळे जे खरे लाभार्थी आहेत त्यांना यापासुन वंचित रहावे लागले असुन या संदर्भात चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करावी अन्यथा बंजारा ब्रिग्रेड रस्त्यावर उतरून त्यांना धडा शिकविल्याशिवाय राहणार असा इशारा बंजारा समाजाचे धडाडीचे नेतृत्व बंजारा ब्रिगेडचे अर्जुन रामराव नायक यांनी आज जिल्हाधिकार्यांना सादर केलेल्या निवेदनातुन दिला आहे.

याबाबत अधिक असे की, एमबीबीएस/बिडीएस/बीएएमएस/बीयुएमएस पी.टी या वैद्यकीय प्रवेश प्रक्रिया २०२४ मध्ये प्रवेश घेणार्या विद्यार्थ्यांची यादी प्रसिध्द झाली असुन या यादीमध्ये एकुण ३१२ बोगस भामटा राजपुत च्या विद्यार्थ्यांनी घुसखोरी केल्याचे स्पष्ट जाणवत आहे, या बोगसमुळे विमुक्त भटक्या जमातीवर अन्याय झशला असुन सवर्ण व बिगर मागास असणार्या लोकांनी या प्रवर्गात घुसखोरी केली आहे, आणि जे खरे लाभार्थी विमुकक्त जाती प्रवर्गातील उमेदवारांना मेडीकलमध्ये ॲडमिशन मिळणे अशक्य झाले आहे, पैशाचा माज दाखवुन या बोगस लागार्थ्यांनी जातवैधता प्रमाणपत्रे मिळवून आपला प्रवेश निश्चित केल्यामुळे गुणवत्ता असुन देखील खरे लाभार्थी केवळ आर्थिक कमजोरीमुळे त्यांना प्रवेश मिळाला नाही त्यामुळे त्यांचे शैक्षणिक नुकसान तर झालेच परंतु त्यांची इच्छाशक्ती देखील कमजोर होण्यास केवळ प्रशासनच जबाबदार असुन याची चौकशी करून संबंधीतांवर तात्काळ करावी अन्यथा बंजारा ब्रिगेड रस्त्यावर उतरून संबंधीतांना चोप दिल्याशिवाय राहणार नाही, आणि याची सर्वस्वी जबाबदारी ही प्रशासनाची राहिल असाही इशारा बंजारा ब्रिगेड प्रदेश सचिव तथा बंजारा समाजाचे धडाडीचे नेतृत्व अर्जुन रामराव नायक यांनी जिल्हाधिकार्यांना सादर केलेल्या निवेदनातुन दिला आहे. या निवेदनावर ॲड.आढे, ॲड पवार, अमीत रामराव राठोड, विजय बाबुराव राठोड, शाम अर्जुन राठोड, सुनिल छबुराव राठोड, सचिन गणेश राठोड यांच्यासह आदींच्या स्वाक्षर्या आहेत.

# आष्टी मतदारसंघातील ४ देवस्थानांच्या विकास कामासाठी १६ कोटी मंजूर

आष्टी । प्रतिनिधी

माजी राज्यमंत्री सुरेश धस यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे आष्टी विधानसभा मतदारसंघातील..आष्टी तालुक्यातील श्रीक्षेत्र रेणुकामाता देवस्थान बेलगाव,श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान सावरगाव आणि पाटोदा तालुक्यातील श्री क्षेत्र संत मीराबाई गुरु भगवान संस्थान महासांगवी आणि श्रीक्षेत्र आ अश्वलिंग महादेव मंदिर पिंपळवंडी या देवस्थानांच्या विकासासाठी ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास विभागाच्या वतीने १६ कोटी रुपयांचा भरघोस निधी मंजूर करण्यात आला आहे.



महाराष्ट्र राज्यातील.." ब " वर्ग दर्जा असलेल्या देवस्थानाच्या ठिकाणी दरवर्षी भाविक भक्त दर्शनासाठी मोठ्या संख्येने हजेरी लावत असतात.. अशा देवस्थानांचा विकास करणे बाबत.. ग्रामीण विकास विभाग शासन निर्णय दि.६ सप्टेंबर २० २४ नुसार ..आष्टी तालुक्यातील..श्री क्षेत्र रेणुका माता देवस्थान बेलगाव येथे वाहन तळ १०० लक्ष रु., मंदिर परिसर सुशोभीकरण १० लक्ष रु.भक्तनिवास १० लक्ष रु.,संरक्षण भिंत १५४ लक्ष रु.,पुरुष भक्त निवास ८५ लक्ष रु.पोहोच रस्ता आणि सीडी वर्क १२० लक्ष रु. आणि पेव्हिंख ब्लॉक १० लक्ष रु.असे एकूण ४ कोटी ९० लक्ष रु.श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान सावरगाव या ठिकाणी प्रसादालय बांधकाम २०० लक्ष रु.वाहनतळ बांधकाम पेव्हर ब्लॉक व कॉंक्रिटीकरण करणे २०० लक्ष रु. असे एकूण ४.०० कोटी रु. पाटोदा तालुक्यातील.. श्री क्षेत्र संत मीराबाई गुरु भगवान संस्थान महासांगवी या ठिकाणी वाहन तळ बांधकाम ४२ लक्ष रु.पुरुष भक्त निवास बांधकाम १०० लक्ष रु. महिला भक्तनिवास बांधकाम ७७.२० लक्ष रु.पोहोच रस्ता २० लक्ष रु. पोलसह एलईडी लाईट १० लक्ष रु.स्ट्रीट लाईट १० लक्ष रु.,संरक्षण भिंत २० लक्ष रु.आणि सुशोभीकरण २० लक्ष रु.असे एकूण ३ कोटी रु. तसेच श्रीक्षेत्र अश्वलिंग महादेव मंदिर पिंपळवंडी या ठिकाणी प्रसादालय बांधकाम ८२ लक्ष रु.भक्तनिवास ५० लक्ष रु. संरक्षण भिंत ४५ लक्ष रु.पेविंग ब्लॉक बसवणे ८० लक्ष रु.पोहोच रस्ता तयार करणे ९० लक्ष रु.आणि सुशोभीकरण करून लेव्हलिंग पथदिवे बसवणे ६३ लक्ष रु. असे एकूण ४ कोटी १० लक्ष रु. अशाप्रकारे या चार " ब " वर्ग दर्जातील मोठ्या देवस्थानाचा विकास करण्यासाठी एकूण १६ कोटी रु.अशी घसघशीत रक्कम मंजूर झाली असल्यामुळे.. या ठिकाणी येणार्या भाविक भक्तांना सुविधा मिळणार आहेत. त्यामुळे ..माजी राज्यमंत्री सुरेश धस यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, आणि ग्रामीण विकास मंत्री गिरीश महाजन आमदार पंकजाताई मुंडे यांचे विशेष आभार व्यक्त केले आहेत..

# मुख्यमंत्री योजनादूत उपक्रमासाठी अर्ज करण्याचे आवाहन

जालना । प्रतिनिधी

शासनाच्या विविध योजनांची सर्वसामान्य नागरिकांना माहिती देण्यासाठी मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम सुरु करण्यात आला आहे. अशी माहिती जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र जालना येथील सहाय्यक आयुक्त भुजंग रिठे, वरिष्ठ लिपिक श्री बोरकर, कनिष्ठ कौशल्य विकास उद्योजक तया मार्गदर्शन बहुरे येणे य माहिती दिली.या उपक्रमात सहभागी होण्यासाठी उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छुक उमेदवारांनी या संकेतस्थळावर नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम राबविण्यात येत आहे. प्रत्येक ग्रामपंचायत पातळीवर एक तर शहरी भागात प्रत्येक पाच हजार लोकसंख्येमागे एक अशा पद्धतीने राज्यात एकूण ५० हजार योजनादूतांची सहा महिन्यांसाठी निवड केली जाणार आहे. या कौशल्य विकास योजनेमार्फत दरमहा ६ हजार, ८ हजार, १० हजार रूपये मानधन पात्रता प्रमाणे दिले जाणार आहे. हे योजनादूत शासनाच्या लोककल्याणकारी योजनांबाबत नागरिकांना माहिती देतील. या योजनेत सहभागी होण्यासाठी इच्छुक उमेदवार १८ ते ३५ वयोगटातील असावा, उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असणे आवश्यक आहे, उमेदवाराकडे महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. उमेदवारास संगणक ज्ञान असावे. त्याच्याकडे अद्ययावत मोबाईल (स्मार्ट फोन) आणि आधारसंलग्न बँक खाते असणे आवश्यक आहे. मुख्यमंत्री योजनादूत उपक्रमासाठी केलेला ऑनलाईन अर्ज, आधार कार्ड, पदवी उत्तीर्ण असल्याबाबतची पुराव्यादाखल कागदपत्रे / प्रमाणपत्र इ., अधिवासाचा दाखला. (सक्षम यंत्रणेने दिलेला), उमेदवाराकडे आधार जोडणी असलेल्या बँक खात्याचा पुरावा, पासपोर्ट आकाराचा फोटो, हमीपत्र (ऑनलाईन अर्जासोबतच्या नमुन्यामधील) नियुक्तीवेळी सादर करणे आवश्यक आहे. १३ सप्टेंबर २०२४ पर्यंत इच्छुक उमेदवारांना .. या संकेतस्थळावर नोंदणी करता येईल.

# गणरायाची आरती पोलीस बांधवांच्या हस्ते करा: जाधव

बीड । प्रतिनिधी

तमाम गणपती मंडळांना महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटना चे मराठवाडा अध्यक्ष यू.आ . आदर्श जाधव यांनी आव्हान व विनंती करण्यात आली की, यावर्षीची गणेश उत्सवाची आरती ही आपल्या रक्षणकर्त्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या हस्ते करण्यात यावी गणेश मंडळ उत्सवाची आरती ११ दिवस म्हणजे २२ वेळा होते त्यातील एका आरती चा मान हा आपल्या मंडळा समोर दिवस रात्र पहारा देणारे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना द्यावा. यामागील उद्देश असा की त्यांना हा गणेशोत्सव त्यांचा कर्तव्यामुळे त्यांचा परिवार सोबत घरी साजरा करता येत नाही.यामुळे आपल्या सर्व गणेश मंडळाने त्यांना आरती चा मान देऊन पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना या उत्सवात सहभागी करून त्यांचा आनंद द्विगुणित होईल. व त्यांचा गणेश मंडळाने सन्मान केल्यासारखे होईल.असे प्रसिध्दी द्वारे पोलीस बॉईज संघटना संस्थापक अध्यक्ष राहुल भैया दुबाले यांचा मार्गदर्शनाखाली आदर्श अरुणराव जाधव (मराठवाडा अध्यक्ष युवक आघाडी) यांनी केले आहे.



# आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण समारंभ उत्साहात

धारूर । प्रतिनिधी

पाच सप्टेंबर रोजी शिक्षक दिन आणि सुस्मृत संभाजीराव जगताप गुरुजी यांच्या चतुर्थ स्मृतिदिनानिमित्त युवा कृषि विज्ञान मंडळ, सामाजिक संस्थेच्या किल्ले धारूर वतीने किल्ले धारुर तालुक्यातील जि.प. शाळांतील शिक्षकांचा आदर्श शिक्षक पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम आयोजित केला. कार्यक्रमाचे अध्यक्षपदी गट विकास अधिकारी संतोष बंगवाडे यांनी भूषवले. प्रमुख वक्ते म्हणून दत्ता भाऊ बारगजे, आणि मंदाताई बारगजे आनंदग्राम, बीड उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरूवात संभाजीराव जगताप गुरुजी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.

प्रमुख अतिथींचे स्वागत गीत गाऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. उपस्थित मान्यवरांचा कृषी विज्ञान मंडळ सामाजिक संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी धारूर तालुक्यातील आदर्श पुरस्कारासाठी निवड झालेल्या शिक्षकांचा मान्यवरांच्या सत्कार करण्यात आला. पुरस्कार मिळालेल्या शिक्षकांमध्ये विसे दीपक रमेशराव, कुलकर्णी शरद दिगांबर, चव्हाण सर्जेराव बन्सी, लोंढे सुधाकर कोंडीबा, गोरे सटवा लिंबाजी, वराट उज्वाला भगवानराव, सलगर सुरेश राजाराम, आणि तारसे सारिका गोपाळराव यांचा समावेश होता. दत्ता भाऊ बारगजे यांनी शिक्षण आणि शिक्षिका संबंधित अनुभव कथन केले आणि त्यांच्या सामाजिक कार्याबद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे समारोप गट विकास अधिकारी संतोष बंगवाडे यांनी केला. त्यांनी शिक्षक दिन आणि संभाजीराव जगताप गुरुजी यांच्या स्मृतिदिनानिमित्त पुरस्कार वितरणाची योजना औचित्यपूर्ण असल्याचे सांगितले. यावेळी मंदा बारगजे आनंदग्राम, बीड आपले अनुभव व्यक्त केले यावेळी पुरस्कार मिळालेल्या लोंढे सुधाकर कोंडीबा आणि वराट उज्वाला भगवान यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रस्तावना कृषी विज्ञान मंडळाचे सचिव सूर्यकांत जगताप यांनी मांडली, तर सूत्रसंचालन आदर्श शिक्षक विलास काळे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन आदर्श शिक्षक श्रीराम सिकची यांनी केले. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने शिक्षक, नागरिक, महिला, पत्रकार बंधू, समाजिक संस्थेचे अध्यक्ष आणि विद्यार्थी उपस्थित होते.




# आगामी सण, उत्सव सलोख्याने व शांततेत साजरे करावेत -जिल्हाधिकारी

जालना । प्रतिनिधी

जिल्ह्यात आगामी काळात विविध श्री गणेश उत्सव व ईद ए मिलाद या सारखे सण, उत्सव साजरे होणार आहेत. तरी जिल्ह्यातील नागरिकांनी कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आगामी सण, उत्सव सलोख्याने व शांततेत साजरे करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवनात जिल्हा शांतता समितीची बैठक दि.६ सप्टेंबर २०२४ रोजी सायंकाळी ४ वाजता पार पडली. यावेळी अपर पोलिस अधिक्षक आयुष नोपाणी, अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार, महापालिका आयुक्त संतोष खांडेकर, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, पोलिस उपअधिक्षक अनंत कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.




जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ म्हणाले की, जालना जिल्ह्याला शांततेत सण, उत्सव साजरे होण्याची पार्श्वभूमी आहे. ती कायम राखत सण, उत्सवात ते अतिशय आनंदाने साजरे करावेत. जालना जिल्ह्यातील सर्व धर्मीय नागरिक अतिशय सलोख्याने राहत असतात. जिल्ह्यातील नागरिकांनी मागील काळात वेळोवेळी शांततेच्या मार्गाने आंदोलने, मोर्चे काढून प्रशासनाला निवेदन देत एक आदर्श समोर ठेवला आहे. श्री गणेश मिरवणूकीच्या मार्गावरील चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. लग्न समारंभात फोटोग्राफी व व्हीडीओग्राफी करण्यासाठी ड्रोन कॅमेऱ्याचा वापर वाढला आहे. तसेच अज्ञात ड्रोनबाबत तपास सुरु आहे. त्यामुळे जिल्ह्यातील नागरिकांनी घाबरुन जावू नये. ड्रोनमुळे कोणताही धोका उदभवणार नाही. जिल्ह्यात विविध जाती, पंथातील नागरिक दोन बंधूप्रमाणे वर्तन करतात. त्यामुळे यापुढेही सामजस्यांचे, धार्मिक सलोख्याचे वातावरण आगामी उत्सवात देखील राखला जाण्यासाठी प्रशासनाकडून समन्वय राखला जाईल. आगामी सण, उत्सवात विविध सामाजिक उपक्रम राबविले जावून उत्सवांना सामाजिक उपक्रमांची सांगड घालावी, असेही त्यांनी सांगितले.

अपर पोलिस अधिक्षक श्री.नोपाणी म्हणाले की, आगामी श्री गणेश उत्सवात मंडळाने सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत. तसेच चोवीस तास गणेश मंडळाचा एक स्वयंसेवक परिसरात नेमावा. श्री गणेश विर्सजनाच्या दिवशी व सर्व कालावधीत मा.सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेली वाद्य तसेच आवाजाची व वेळेची मर्यादा पाळावी. सोशल मीडियावरील अफवांवर विश्वास ठेवू नका तसेच कोणतीही संदिग्ध पोस्ट शेअर, लाईक करु नये. श्री गणेश मिरवणूकीवर पोलिस विभागाकडून ड्रोन कॅमेऱ्याद्वारे नजर ठेवली जाणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. या बैठकीस शांतता समिती सदस्य, विविध श्री गणेश मंडळाचे पदाधिकारी, मुस्लीम समाज बांधव, महिला व युवक, संबंधित विभागाचे कार्यालयप्रमुख आदि मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पुराने बाधित झालेल्या ५५० हुन अधिक कुटुंबांना नाथ प्रतिष्ठानकडून प्रत्येकी १० हजारांची मदत

**परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी**

परळी वैजनाथ शहरात मागच्या आठवड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे सरस्वती नदीला आलेल्या पुरात ५५० पेक्षा अधिक कुटुंब बाधित होऊन त्यांच्या घरात पाणी शिरल्याने संसार उपयोगी साहित्य धान्य आदींचे नुकसान झाले होते. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ प्रतिष्ठानच्या वतीने ५५० पेक्षा अधिक कुटुंबांना प्रतिक कुटुंब दहा हजार रुपयांची तातडीची आर्थिक मदत रविवारी धनंजय मुंडे यांच्या उपस्थितीत देण्यात येणार आहे.



## तातडीच्या आपत्ती निधीतूनही प्रशासनाकडून प्रत्येक कुटुंबाला ५ हजारांची मदत; रविवारी धनंजय मुंडेंच्या उपस्थितीत एकत्रित होणार वितरण

## प्रत्येक बाधित कुटुंबाला मोफत धान्याच्या किटही देणार

आपत्ती व्यवस्थापनाच्या तातडीच्या आपत्ती निवारण निधीतून देखील प्रशासनाच्या वतीने या प्रत्येक बाधित कुटुंबाला नियमाप्रमाणे प्रत्येकी ५००० रुपये याप्रमाणे तातडीची मदत देखील धनंजय मुंडे यांच्या उपस्थितीत देण्यात येणार आहे अशी माहिती तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांनी दिली आहे. सरस्वती नदीला आलेल्या पुरानंतर धनंजय मुंडे यांनी या भागात प्रत्यक्ष जाऊन नागरिकांच्या भेटी घेत त्यांना धीर व दिल्यास दिला होता तसेच प्रशासनाला तात्काळ मदत करण्याच्या सूचना दिल्या होत्या. शासनाच्या नियमानुसार पुराच्या पाण्याने नुकसान होऊन घरातील भांडी कपडे धान्य आदींचे नुकसान झाल्यानंतर प्रत्येक कुटुंबाला शासनाच्या वतीने प्रत्येकी पाच हजार रुपये मदत दिली जाते, शासनाच्या बरोबरीने किंबहुना त्याहूनही दुप्पट मदत नाथ प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेच्या वतीने धनंजय मुंडे यांच्याकडूनही दिली जात आहे.

परळी वैजनाथ शहरातील बरकत नगर, रहिमत नगर, भीमा नगर, स.क्र.७५ यांसह विविध भागातील बाधित कुटुंबीयांना यामुळे दिलासा व आधार मिळणार आहे. या दोन्ही मदतीचे रोखीने धनंजय मुंडे यांच्या उपस्थितीत रविवारी एकत्रितपणे दुपारी एक वाजता श्री वैद्यनाथ गणेश महोत्सवाच्या स्व.पंडित अण्णा मुंडे सभामंडपात वितरण करण्यात येणार असल्याची माहिती नाथ प्रतिष्ठानचे कार्यवाह वाल्मिक अण्णा कराड यांनी दिली आहे.

# समाजात वावरतांना मुलींनी दक्ष राहिले पाहीजे-सपोनि शेंडगे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

समाजात वावर असतांना कोणत्या आमिषाला बळी न पडता मुलीने स्वतःच्या संरक्षणासाठी दक्ष राहीले पाहीजे, असा सल्ला युसूफवडगाव येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे यांनी मुलींना दिला. तालुक्यातील आपेगाव येथील जयकिसान माध्यमिक विद्यालयात मुलींच्या संरक्षणाबाबत मार्गदर्शन करताना दि. ५ रोजी ते बोलत होते.




जिल्हा परिषदेचे माध्यमिक शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे यांनी पोलीस प्रशासनामार्फत मुलींना मार्गदर्शन करण्याच्या सूचना सर्व शाळेतील मुख्याध्यापकांना दिल्या आहेत. त्या सूचनेची अंमलबजावणी करीत शाळेच्या वतीने युसुफवडगाव येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे यांचे मार्गदर्शन ठेवण्यात आले होते. यावेळी मुलींनी स्वसंरक्षणाबाबत घ्यावयाच्या काळजीबाबत शेंडगे यांनी महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. मुलींनी कोणत्याही अनोळखी व्यक्तीशी संपर्क ठेवू नये. शाळेतील मुलगा किंवा शाळे बाहेरील व्यक्ती त्रास देत असेल तर गप्प न राहता वेळीच आपल्या आई वडीलांना व शिक्षकांना सांगावे. यासह त्यांनी इतर सुचना यावेळी मुलींना दिल्या. यावेळी संस्थेचे सचिव प्रा. जयजीत शिंदे, शाळेचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य प्रा. एन. के. हजारे यांची मंचावर उपस्थिती होती. याप्रसंगी शाळेतील शिक्षक डी. यु. काळे, सचिव प्रा. जयजीत शिंदे, मुख्याध्यापक तथा प्राचार्य प्रा. एन. के. हजारे यांनी ही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन एस. बी. देशमुख यांनी केले तर सर्वांचे आभार बी. डी. उगले यांनी मानले.



**बीड : शहरात क्षीरसागर कुटुंबियांच्या निवासस्थानी श्रींची स्थापना करण्यात आली. यावेळी माजी नगराध्यक्ष डॉ.भारतभूषण क्षीरसागर, डॉ.दीपाताई क्षीरसागर, राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर आदींची उपस्थिती होती. क्षीरसागर कुटुंबियांकडून गणेशोत्सवानिमित्त शुभेच्छा देण्यात आल्या.**

# दत्तप्रसादआजमेरा यांच्या बाजूने दिलेल्या लातूरच्या सहनिबंधकाच्या निकालास खंडपीठाची स्थगिती

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

शहरातील गुरूवार पेठ भागातील दत्तप्रसाद आजमेरा यांनी अंबाजोगाई पिपल्स को-ऑप बँकेकडून ५० लाख रूपयांचे कर्ज घेतले होते. ते थकल्यामुळे बँकेने वसुलीचे कारवाई केली. आजमेरा यांनी त्यांचे घर विक्री करण्याचा ठराव नरसिंग व नारायण रांदड यांच्या सोबत केला. त्यानुसार रांदड यांनी पिपल्स बँकेकडे गृहकर्जाची मागणी करून सर्व कर्ज प्रक्रिया पुर्ण केली. या कर्जास जामीनदार म्हणून स्वतः अजमेरा सुद्धा होते. या कर्जाच्या रक्कमेतून रांदड यांनी आजमेरा यांच्या कर्ज खात्यात रक्कम भरून गृह खरेदीचा प्रक्रिया पुर्ण करून गृह कर्जाचे गहाणखत केले. रांदड यांनी खंडपीठात धाव घेतल्यानंतर खंडपीठाच्या निर्णयामुळे दत्तप्रसाद आजमेरा यांना मोठा झटका मिळाला आहे.

**नारायण रांदड यांनी दाखल केलेल्या तक्रारीमुळे खंडपिठाचा दिलासा**

या प्रकरणात दत्त प्रसाद आजमेरा यांनी रांदड व पिंपल्स बँकेविरूद्ध महाराष्ट्र सावकारी नियम अधिनियम २०१४ कलम नियमन आदी कलम १८(२) प्रकरण जिल्हा सह निबंधक सहकारी संस्था बीड यांच्याकडे दाखल केले. सदरच्या प्रकरणात आजमेरा यांनी खरेदी खत व गहाण खत रद्द करणाची मागणी केली होती. या प्रकरणात संपुर्ण न्यायीक प्रक्रिया, साक्ष जवाब नोंदविण्यात आले. या प्रकरणात आलेल्या सर्व बाबी बँकेच्या व्यवहारास सावकारी म्हणता येणार नाही. असा निर्णय देवून आजमेरा यांचे प्रकरण फेटाळले. याच्या नाराजीने आजमेरा यांनी विभागीय सहनिबंधक लातूर यांच्याकडे आपील दाखल केले. या प्रकरणात सुनावणी घेवून मुख्यतः दत्तप्रसाद आजमेरा व रांदड यांच्यात झालेले खरेदीखत व बँककडे झालेले गहाणखत हे दोन्ही दस्ताऐवज एकाच दिवशी झाले असल्यामुळे झालेला व्यवहार हा सावकारीत झाले असल्याची शंका व्यक्त झाल्यामुळे हे आपील मंजूर केले. या आपीलातील निर्णयाच्या नाराजीने रांदड यांनी उच्च ◀◀ पान ३ वर

# शिवसेना कामगार मेळावा व शिवसेना शहर मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

शहर व तालुक्यातील विविध कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी दिनांक ८रोजी रविवारी सकाळी १० वाजता शिवसेना कामगार मेळावा व शिवसेना शहर मध्यवर्ती कार्यालय, अंबाजोगाई उद्घाटन होणार असल्याची माहिती शिवसेना शहरप्रमुख ऋषिकेश लोमटे व उपजिल्हाप्रमुख गजानन मुडेगावकर यांनी दिली आहे

या मेळाव्याला मुख्यमंत्री वैद्यकिय सहाय्यता कक्ष तथा विशेष कार्य अधिकारी-मुख्यमंत्री मंगेश चिवटे यांची प्रमुख उपस्थिती राहणार असुन, प्रमुख अतिथी म्हणून शिवसेना



प्रवक्त्या ज्योतीताई वाघमारे ,बाजीराव चव्हाण युवासेना निरीक्षक मराठवाडा मा. इंजि. किरण कोरे युवा व्याख्याते,सचिन मुळूक शिवेसना जिल्हाप्रमुख, यांची प्रमुख उपस्थिती राहणार असुन दिनांक ८ रोजी सकाळी १० वाजता कामगार मेळावा व शहर कार्यालयाचे उद्घाटन करण्यात येणार आहे या

हे कार्यक्रम स्व. मीनाताई ठाकरे चीक, कै. ॲड. अण्णासाहेब लोमटे (नवाब) कॉम्प्लेक्स, घुगे हॉस्पिटल समोर, प्रशांत नगर, अंबाजोगाई येथे होणार आहेत तरी या कार्यक्रमाला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजक ऋषिकेश लोमटे व गजानन मुडेगावकर यांच्या सह शिवसेना, युवासेना, महिला आघाडी, ॲटोरिक्षा युनियन, कामगार सेना व समस्त शिवसैनिक, अंबाजोगाई, जि. बीड यांनी केले आहे. या मेळाव्याच्या निमित्ताने चौका चौकात ◀◀ पान ३ वर

# माजलगाव शहरासह ग्रामीण भागात सर्वत्र मंगलमय वातावरणात गणरायाचे आगमन

**माजलगाव । प्रतिनिधी**

संकटमोचक, विघ्नहर्ता श्री गणेशाचे दि ०७ सप्टेंबर शनिवार रोजी घरोघरी आगमन झाले असून माजलगाव शहरासह ग्रामीण भागात गणेश चतुर्थीनिमित्ताने सर्वत्र आनंदी आणि उर्जादायी वातावरण आहे. लाडक्या बाप्पाच्या स्वागत अबालवृद्ध ठिकठिकाणी धुमधडाक्यात करत आहेत.शहरात सर्वत्र बाजार पेठामध्ये ही बाप्पाच्या आगमनाची लगबग पहायला मिळत आहे.

दि ०७ सप्टेंबर शनिवार सकाळ पासूनच माजलगाव शहरासह ग्रामीण भागातील भाविकांनी 'बाप्पा'ला घरी नेत प्रतिष्ठापणा करण्याची तयारी सुरू केली आहे. प्रत्येकाच्या घराघरात, मंडपा-मंडपात मोठ्या उत्साहाने आणि श्रद्धेने श्री गणरायांच्या मूर्तींची



प्राणप्रतिष्ठा करण्यात येत आहे.अनेक घरगुती तसेच सार्वजनिक मंडळातील गणेशोत्सवाला भक्तीचा नवा जोश आला आहे.

## शहराध्यक्षपदी बाळासाहेब गायकवाड यांची निवड

शिरूर कासार । प्रतिनिधी



येथील रहिवासी तथा तरूण आणि मनमिळावू मित व मधूभाषी बाळासाहेब रघुनाथ गायकवाड यांची राष्ट्रवादी (शरद पवार गट ) शिरूर शहाराध्यक्ष पदी निवड केली गेली . बाळासाहेब गायकवाड यांचा संपर्क व स्वभाव पक्षीय कामकाजाला पोषक असल्याने त्यांची वरिष्ठांच्या संमतीनूसार तालुकाध्यक्ष दिपक खोले यांनी निवडीचे पत्र दिले आहे .गायकवाड याच्या या निवडीचे मित्रपरिवारातून मोठे स्वागत होत आहे .

# राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे जिल्हा उपाध्यक्ष क्षीरसागर अजित पवार गटात

**माजलगाव । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) गटातील जिल्हा उपाध्यक्ष सिताराम क्षीरसागर यांनी या पक्षाला सोड चिट्टी देत आपल्या समर्थका सह आमदार प्रकाश सोळंके यांच्या नेतृत्वाखाली अजित पवार यांच्या पक्षात प्रवेश केला असून त्यांचे स्वागत आमदार प्रकाश सोळंके यांनी केले आहे.



तालुक्यातील शरद पवार पक्षाचे नेतृत्वावर नाराजी व्यक्त करीत क्षीरसागर यांनी या पक्षाला सोडते दिले असेल आमदार सोळंके यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याचे ठरवले आहे. त्यांच्या समर्थकांसह झालेल्या प्रवेशानंतर आमदार सोळंके यांनी त्यांना शुभेच्छा देत लवकरच आपली एखाद्या पदावर नियुक्ती करण्यात येईल असे आश्वासन दिले तसेच त्यांच्यासोबत गेलेल्या समर्थकांनाही प्रकाश सोळंके यांनी आपण कोणतेही काम घेऊन या ते आपण ◀◀ पान ३ वर

## घोंगडी बैठकीस हजारोंच्या संख्येने उपस्थित रहा- अमित घाडगे पाटील

**परळी । प्रतिनिधी**

मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी राज्यभरात सभा, रॅली, काढलेल्या आपण पाहिलेले आहेत. आता मनोज जरांगे पाटील यांनी बीड जिल्ह्यातील प्रत्येक विधानसभा मतदार संघात घोंगडी बैठकांचे आयोजन केलेले आहे. याच अनुषंगाने मराठा आरक्षण जागर घोंगडी बैठक परळी मतदार संघात होणार आहे. आज दि. ८ सप्टेंबर रोजी सकाळी ११वा. परळी शहरातील हालगे गार्डन येथे होणार आहे. बैठकीला हजारोंच्या संख्येने समाज बांधवांनी उपस्थित राहावे असे आव्हान परळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा मराठा सेवक अमित घाडगे पाटील यांनी एका प्रसिद्धी पत्रकार केले आहे.



परळी वैद्यनाथाच्या पायथ्याशी असलेल्या हालगे गार्डन परळी विधानसभा ◀◀ पान ३ वर

# राष्ट्रीय पोषण सप्ताहानिमित्त अंगणवाडीमध्ये फळांचे वाटप

परळी । प्रतिनिधी

कै लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय हे नेहमी सामाजिक बांधिलकी जपत असते व सामाजिक उपक्रम राबवीत असते.

दि. ५ रोजी या महाविद्यालयाच्या गृहविज्ञान विभागातर्फे राष्ट्रीय पोषण सप्ताहानिमित्त परळी येथील कंडक्टर कॉलनीत असलेल्या अंगणवाडीमध्ये विविध प्रकारच्या पोषक फळांचे वाटप करण्यात आले. तसेच विभाग प्रमुख डॉ. रागिणी पाध्ये त्यांनी या भागातील गर्भवती स्त्रियांना स्वतःच्या व बाळाच्या सुदृढ स्वास्थ्यासाठी पोषण आहाराविषयक महत्वाचे मार्गदर्शन केले . गर्भवती स्त्रियांचे पोषक आहाराने ओटी भरणही करण्यात आले. या

## महिला महाविद्यालयातील गृहविज्ञान विभागाचा स्तुत्य उपक्रम




कार्यक्रमासाठी गृहविज्ञान विभागातील सर्व विद्यार्थिनींची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

# पांगलेली मन जोडणे, विस्कटलेली घडी पुर्वपदावर आणण्याचा स्तुत्य उपक्रम!

## एक गांव एक गणपती नव्हे तर ५६ गांव आणि एक गणपती; कुठेच नसेल असा गणपती उत्सव शिरूर तालुक्यात

**शिरूर कासार । प्रतिनिधी**

आजपासुन गणपती महोत्सव सुरू होतोय ,सुखकर्ता आणि दु: हर्ता असा देव म्हणून गणपतीला अग्रस्थानी मानले जाते ,सध्याच्या वातावरणात माणसाची मन एकमेकापासून दुरावत चालली आहेत तसेच विस्कटलेलीहघडी पुर्वपदावर आणन्यासाठी एक गांव एक गणपती नव्हे तर छपन्न गांव एक गणपती असा कुठेच नसेल असा उपक्रम तालुक्यात राबवला जातोय ,मनोज जरांगे पाटील नावांने गणपती मंडळाने हा स्तुत्य उपक्रम राबवला आहे .

### पोलीस प्रशासनावरचा ताण हलका होईल !

जवळपास अर्ध्या तालुक्याचा एकच गणपती असल्याने पोलीस यंत्रणेवरचा बंदोबस्ताचा ताण काहिसा हलका होण्यास मदत होईल असे स.पो.नि.गणेश धोकरट यांनी सांगितले ,शांततेत व पावित्र सांभाळून या उत्सवाचा आनंद सर्वांनी घ्यावा असे आवाहन देखील केले .

गणपती उत्सव आलाकी गल्लीबोळात गणपती मंडळ तयार होतात ,प्रतेक जन आपला गणपती सर्वोकृष्ठ असेल यासाठी प्रयत्नशिल असतो मात्र नकळत यातून ईर्षा उत्पन्न होते हे कळून देखील येत नाही ,या सर्व प्रकाराला थेट तिलांजली देण्यासाठी तालुक्यातील छपन्न गणपती मंडळाने या गणपती मंडळात आपले विलीनीकरण करून छपन्न गावचा एकच गणपती त्यासाठी भव्य असे राजेशाही मंडप व प्रवेशद्वार उभारले आहे.

या गणपती मंडळाने अनेक चांगले उद्दिष्ट समोर ठेवले आहेत त्यात शिवकथा गणेशभक्तांना ◀◀ पान ३ वर



### ही गांव आहेत समाविष्ट !

शहरातील दहा मंडळासह कान्होबाची वाडी ,विघनवाडी ,झापेवाडी , राक्षसभुवन ,खोलेवाडी ,पिंपळेवाडी ,कोळवाडी , रूप्पुर, गोमळवाडा,हिंगेवाडी ,चाहुरवाडी ,वडळी ,मदमापुरी ,उखळवाडी ,जेधेवाडी ,जाटनांदूर ,भिलारवाडी ,मोरजळवाडी ,मुळीकवाडी ,भडखेल ,नागरेवाडी ,येवलवाडी ,डिसलेवाडी ,दत्तनगर ,भानकवाडी ,बरगवाडी ,हिवरसिंगा ,ढोरकडवाडी ,रूपेवाडी ,शिरापुर धूमाळ ,खालापुरी ,पौंडूळ एक ,दोन ,जांब ,शिरापुर गात ,आर्वी ,तरडगव्हन ,गाजीपुर ,फुलसांगवी ,मार्कडवाडी ,येळंब ,निमगांव ,नारायणवाडी ,वरंगळवाडी ,आनंदवाडी , शास्त्री नगर ,मातोरी ,खामकरवाडी या गावचे गणपती विलिन झाले आहेत आणखी गावची संख्या जोडली जाणार असल्याचे सांगितले गेले .

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
रविवार दि.०८ सप्टेंबर २०२४ । पान ७



# श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती जटोली शिव मंदिरात विराजमान; दर्शनासाठी भाविकांची गर्दी

लाडक्या बाप्पाच्या आगमनाची सर्वत्र जय्यत तयारी सुरू झाली आहे. घरगुती आणि सार्वजनिक गणेश मंडळांकडून जल्लोषात बाप्पांची मिरवणूक काढून त्यांचं स्वागत केलं जात आहे. पुण्यातील मानाच्या आणि महत्त्वाच्या गणपतींची ख्याती जगभर आहे, त्यामुळे हा सोहळा पाहण्यासाठी केवळ राज्यातून नव्हे तर राज्याच्या बाहेरून अगदी परदेशातूनही अनेक भाविक, पर्यटक पुण्यात येतात.







पुण्यातील मानाच्या पाचही गणपतीच्या मिरवणुकीला सुरुवात झाली आहे. त्यासोबतच पुणेकरांचा लाडका बाप्पा म्हणजेच श्रीमंत दगडूशेठ गणपतीचे थाटात आगमन झाले आहे. लाडक्या बाप्पाचा आगमन सोहळा पाहण्यासाठी पुणेकर उत्सुकता झाले आहेत. सिंह रथामधून दगडूशेठ गणपतीची मिरवणूक निघाली आहे. सिंह रथाला फुलांची सुंदर आरास केली आहे. त्यानंतर जटोली शिव मंदिरात दगडूशेठ गणपती बाप्पा विराजमान झाले आहे. दुपारी १२:१५ वाजता दगडूशेठ गणपतीची प्राणप्रतिष्ठापना संपन्न झाली. दगडूशेठ गणपतीच्या स्वागतासाठी विविध ढोल-पथकांनी वादन झाले. दगडूशेठ मंदिराच्या परिसर 'मोरया मोरया'च्या जयघोषाने दुमदुमला आहे. दगडूशेठ गणपतीचे दर्शन घेण्यासाठी मोठ्या संख्येने भाविकांनी गर्दी केली आहे.

जल्लोषपूर्ण वातावरणात श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती बाप्पा विराजमान

हिंदुस्थानातील पहिला सार्वजनिक गणपती असलेल्या 'श्रीमंत भाऊसाहेब रंगारी सार्वजनिक ट्रस्ट'चे बाप्पा शनिवारी मोठ्या जल्लोषात हजारो भाविकांच्या उपस्थितीत 'वरद विघ्नेश्वर वाड्यात' विराजमान झाले. प्रसिद्ध गायक पद्मश्री कैलाश खेर यांच्या हस्ते दुपारी पावणे एकच्या सुमारास मंत्रोच्चारात ही प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. तत्पूर्वी, बाप्पाची ढोल-ताशा पथकांच्या गजरात मोठ्या थाटामाटात मिरवणूक काढण्यात आली होती, यामध्ये हजारो भाविक सहभागी झाले होते.

# पुण्यात पुढील तीन दिवस अतिमुसळधार बरसणार

पुणे : , बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा तयार झाल्याने मान्सूनचे वारे पुन्हा सक्रिय झाले आहेत. त्यामुळे पुणे शहर घाटमाथ्यासह जिल्ह्याला हवामान विभागाने ७ ते ९ सप्टेंबर या कालावधीत अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे.

खडकवासला धरणातील विसर्ग शुक्रवारी (दि.७) कमी करण्यात आला, तरीही सायंकाळी भिडे पूल पाण्याखाली गेल्याने तेथील रहदारी बंद केली आहे. गेले काही दिवस राज्यातील इतर भागांतून पाऊस गायब झाला असला, तरी पुणे शहरात मात्र पाऊस सुरूच आहे. दररोज रिमझिम पावसाची हजेरी आहे. त्यातच शुक्रवारी सायंकाळी शहरात गार वारे सुटून पावसाला सुरुवात झाली. शहराला काळ्याभोर ढगांनी घेरले.

हवामानतज्ज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा तयार झाल्याने शहरात मासूनचे वारे सक्रिय झाले आहेत. त्यामुळे घाटमाथ्यासह पुणे शहर आणि जिल्ह्याला अतिमुसळधारेचा इशारा दिला आहे.

विसर्ग केला कमी, पण...खडकवासला धरणाच्या सांडव्यातून मुठा नदीपात्रात सुरू असणारा विसर्ग शुक्रवारी दुपारी ३ वाजता विसर्गाचा वेग ११ हजार क्युसेकवरून ८ हजार ७३४ इतका केला आहे. मात्र, हे सोडलेले पाणी सायंकाळी भिडे पुलापर्यंत आले, त्यामुळे हा पूल सायंकाळी ६च्या सुमारास पाण्याखाली गेला. त्यामुळे तेथील रहदारी बंद करण्यात आली. पोलिसांनी त्या ठिकाणी गस्त घालण्यास सुरुवात केली आहे.

# ट्रॅव्हल बसने दिलेल्या धडकेत मोटारसायकलवरील तीन तरुण मित्रांचा मृत्यू





मंचर - जुन्या पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावर मंचरच्या दक्षिणेला दोन किलोमीटर अंतरावर शेवाळवाडी (ता. आंबेगाव) ग्रामपंचायतीच्या हद्दीत श्रावणी हॉटेलच्याजवळ ट्रॅव्हल बसने धडक दिली. झालेल्या भीषण अपघातात मोटारसायकलवरील तीन तरुण मित्रांचा मृत्यू झाला आहे. प्रतीक तुकाराम गारे (वय-२१, रा. हिवरे, ता. जुन्नर), तेजस मारुती घोडे (वय-२१, रा. बोरघर, ता. आंबेगाव) व करण ज्ञानेश्वर ढेंगले (वय-१८, रा. ढेंगळेवाडी, ता. जुन्नर) अशी मृत्यूमुखी पडलेल्या तरुणांची नावे आहेत. शनिवारी (ता. ७) पहाटे दीड वाजता अपघात झाला.

ट्रॅव्हल्स बस चालक राजेशकुमार भोलुराम गुजर (रा. पुरोहित काबास, सिखर, राजस्थान) याच्या विरोधात मंचर पोलीस ठाण्यात अपघात केल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत मंचर पोलिसांनी दिलेली माहिती - शनिवारी प्रतीक, तेजस व करण हे तीन मित्र मंचर ओलांडल्यानंतर पुण्याच्या दिशेला मोटरसायकल (एमएच १४ एचएल ६९०१) वरून जात होते. पाठीमागून भरधाव आलेल्या राजवाडी ट्रॅव्हल्स बसने (आरजे २३ पीबी २७११) मोटारसायकलला धडक दिली. अपघातात तिघांचाही मृत्यू झाला.

अपघात झाल्यानंतर बस चालक राजेशकुमार गुजर पळून चालला होता. पण भीषण अपघाताच्या झालेल्या आवाजाने आजुबाजूचे नागरिक मदतीसाठी धावून आले. त्यांनी पाठलाग करून चालक गुजरला पकडून घटनास्थळी आलेले पोलीस अविनाश दळवी, विनोद जांभळे, प्रणव उकिरडे, यशवंत यादव यांच्या ताब्यात दिले. तीन मित्र गणेशोत्सवासाठी पुण्याला जात होते. अशी माहिती पोलिसांनी दिली. अपघताबाबत तुकाराम जानकु गारे यांनी बसचालकाच्या विरोधात मंचर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. मंचर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्रीकांत कंकाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सुनील धनवे करत आहेत.

# राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचा प्रतिनिधी सांगणाऱ्या तोतयावर गुन्हा दाखल

पुणे । प्रतिनिधी

राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचा महाराष्ट्र राज्याचा प्रतिनिधी म्हणून सांगणाऱ्या एका तोतया व्यक्तीवर सांगवी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना ४ मे २०२५ ते ६ सप्टेंबर २०२४ या कालावधीत पिंपळे सौदागर परिसरात घडली.




ओंकार श्यामराव जोशी (वय ४५, रा. पिंपळे सौदागर) असे गुन्हा दाखल झालेल्या तोतयाचे नाव आहे. याप्रकरणी पोलीस अंमलदार तुषार साळुंखे यांनी सांगवी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी याने स्वतः लोकसेवक म्हणून राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचा महाराष्ट्र राज्याचा प्रतिनिधी हे अधिकारपद धारण केलेले नाही हे त्यास माहित असताना देखील त्याने ते अधिकारपद धारण करण्याचा बहाणा केला. राहत्या परिसरातील अन्य लोकांना तशी त्याने बतावणी केली. तो त्या अधिकारपदावर आहे असा लोकांमध्ये समज व्हावा म्हणून त्याने जाणीवपूर्वक त्या अधिकारपदाचे बनावट व्हिजीटींग कार्ड बनवून घेतले. त्यावर त्याने शासनाच्या परवानगीशिवाय अशोक स्तंभ या राज्य प्रतीकाचा वापर केला. त्याने त्या व्हिजीटींग कार्डचा वापर तोतयागिरी करून लोकांची फसवणूक करण्यासाठी केला असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. सांगवी पोलीस तपास करीत आहेत.



# मेट्रोच्या कामांमुळे रस्त्यांची दुरवस्था

**पुणे । प्रतिनिधी**

माण- हिंजवडी शिवाजीनगर या परिसरातील रस्त्याची दुरवस्था झाल्याने वाहनधारकांसह नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

याची दखल घेत पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) मेट्रो रेल लिमिटेड कंपनीला (पीआयटीसीएमआरएलला) नोटीस बजावली आहे. यात संबंधितांना पंधरा दिवसांत कामे पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. संबंधित कंपनीकडे माण-हिंजवडी ते शिवाजीनगर या भागांतील रस्त्याची बांधा वापरा हस्तांतरीत करा' या तत्वावर जबाबदारी आहे. मात्र, गेल्या काही दिवसांपासून संबंधित भागातील रस्त्याची दुरवस्था झाल्याने नागरिकांसह वाहनधारक त्रस्त आहेत. त्यामुळे संबंधित रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्यासंदर्भात पीएमआरडीए'चे महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी संबंधित सवलतकार सवलतकार पुणे आयटीसीटी मेट्रो रेल लिमिटेड यांना नोटीस बजावली. यात आगामी पंधरा दिवसात अपेक्षितरित्या रस्ता दुरुस्त करण्याचा अल्टिमेटम देण्यात आला आहे. संबंधित कालावधीत तर काम पूर्ण झाले नाही तर मेट्रोचे सेक्शन १ मधील काम थांबवण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

# टिकाराम जगन्नाथ महाविद्यालयास नॅक ए' श्रेणी

**पुणे । प्रतिनिधी**

खडकी शिक्षण संस्थेच्या टिकाराम जगन्नाथ महाविद्यालयास नॅक मूल्यांकन समितीकडून ए' श्रेणी प्राप्त झाली आहे. त्यामुळे महाविद्यालयाच्या लौकिकात भर पडली आहे, असे संस्थेचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल यांनी सांगितले.



महाविद्यालयाचे नॅक मूल्यांकन दि. ३० व ३१ ऑगस्ट रोजी पार पडले. याचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला. त्यात महाविद्यालयास ए' श्रेणी मिळाली आहे. गेल्या पाच वर्षांत महाविद्यालयाने अभ्यास, अभ्यासेत्तर व इतर अभ्यासपूरक राष्ट्रीय छात्र सेना, स्पर्धा परीक्षा क्रीडा नेमबाजी या सर्व प्रकारांत मोठ्या प्रमाणात आघाडी घेतली आहे. त्याचा हा परिणाम आहे. या यशाबद्दल गोयल यांनी प्राचार्य संजय चाकणे व राजेंद्र लेले यांचा सत्कार केला. संस्थेने विषेशत: पायाभूत सुविधामध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा केले आहे, याकडे प्राचार्यांनी लक्ष वेधले. त्यांनी महाविद्यालयाने केलेले संशोधन लिखाण, क्रीडा क्षेत्रात केलेली उल्लेखनीय कामगिरीचा आढावा घेतला. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष अनिल मेहता, सचिव आनंद छाजेड, सहसचिव सुरजभान अगरवाल ,संचालक रमेश अवस्थी, भुतडा, पंगुडवाले, अजय सूर्यवंशी, मुरकुटे, काशिनाथ देवधर आणि महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रा. अर्जुन मुसमाडे यांनी आभार मानले.

# आयटी कंपनीला टेंडरसाठी धमकी

पुणे । प्रतिनिधी

आयटी कंपन्या, इंडस्ट्रीवर कामाचे टेंडर मिळविण्यासाठी अनेकांकडून प्रत्यक्ष- अप्रत्यक्ष दबाव आणला जात असल्याचे काही घटनांमुळे समोर आले. अशा प्रकारे कंपन्या, इंडस्ट्रीज् वर दबाव आणणार्यांवर मोक्का कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात येणार आहे, असा इशारा माहिती पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली.

गुरूवारी चंदननगर पोलीस ठाण्यात ट्रान्सपोर्टच्या टेंडरसाठी आयटी कंपनी प्रशासनाला दमदाटी करणार्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला. त्याविषयी पोलीस आयुक्त बोलत होते.खराडी येथील बारक्लेज ग्लोबल सर्व्हिस सेंटर कंपनीला ट्रान्सपोर्टच्या टेंडरसाठी दमबाजी करणार्या दोघांवर चंदननगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वैभव पाचारणे, सोमनाथ पठारे (दोघेही रा. खराडी) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.आरोपी पाचारणे, पठारे यांनी कंपनीत बेकायदा प्रवेश करत आम्ही स्थानिक आहोत असल्याचे सांगित आमच्या व्हेंडरांना ट्रान्सपोर्टची कामे द्या असे दमबाजी केली.जर आमच्या व्हेंडर्सना काम दिले नाही तर आम्ही कंपन्याच्या गाड्यांचे नुकसान करू. तरीही व्हेंडरला काम मिळाले नाही तर कंपनीच्या मॅनेजमेंटला सोडणार नाही अशी धमकी दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे. सहाय्यक पोलिस निरीक्षक लिगाडे तपास करत आहेत.

कंपन्यांनी तक्रार द्यावी

पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी शुक्रवारी शहारातील आयटी कंपन्यांच्या प्रमुखांची बैठक बोलविली होती. त्यावेळी अमितेश कुमार यांनी अशा प्रकारे दमबाजी करणार्याविरुद्ध तक्रार देण्यासाठी कंपन्यांनी पुढे येणाचे आव्हान केले. तसेच पुणे पोलीस तुमच्या पाठिमागे भक्कमपणे उभे असल्याची ग्वाही यावेळी दिली.

# कुंडमळा येथे बुडून दोघांचा मृत्यू

तळेगाव : इंदोरीजवळील कुंडमळा येथील वेगाने वाहणाऱ्या पाण्याच्या प्रवाहात वाहत जाऊन तरुण-तरुणीचा मृत्यू झाला. ही घटना गुरुवारी (दि.५) घडली होती. तरुणाचा मृतदेह त्याच दिवशी सापडला. तर तरुणीचा मृतदेह आज (दि. ७) सकाळी सापडला. रोहन ज्ञानेश्वर ठोंबरे (वय २२, रा. चिंचवड), श्रेया सुरेश गावडे (वय १७, रा. चिंचवड) असे मृत तरुण-तरूणीचे नाव आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, तरुण तरुणी गुरुवारी (दि.०५) सकाळी मित्रांसोबत कुंडमळा येथे फिरावयास आले होते. सकाळी ९ च्या सुमारास सेल्फीच्या नादात श्रेया गावडे पाय घसरुन पाण्यात पडली. तिला वाचविण्यासाठी रोहन ठोंबरे पाण्यात उतरला असता वेगवान पाण्याच्या प्रवाहात दोघे वाहून गेले. रोहन एका खासगी कंपनीत नोकरीस होता. श्रेया ११वी मध्ये शिकत होती. रोहनचा मृतदेह गुरुवारी दुपारच्या सुमारास मिळाला. श्रेयाचा मृतदेह आज सकाळच्या सुमारास मिळाला. याकामी वन्यजीव रक्षक मावळ संस्थेचे आणि आपदा मित्रचे निलेश गराडे, अनिल आंद्रे, भास्कर माळी, विनय सावंत, गणेश गायकवाड, राजेंद्र बांडगे, रवी कोळी, शुभम काकडे, सत्यम सावंत, मनिश गराडे, राजू सय्यद यांनी परिश्रम घेतले. तसेच तळेगाव दाभाडे नगरपरिषदेच्या अग्निशमन दलाच्या जवानांचे सहकार्य मिळाले.

# खंबाटकी घाटात वाहनांची मोठी वाहतूक कोंडी! खंडाळ्यापर्यंत लागल्या वाहनांच्या रांगा

खंडाळा : सध्या राज्यभर गणेशोत्सवाची धुमधाम आहे. सर्वत्र गणरायाचे जल्लोषामध्ये स्वागत केले जात आहे. तसेच गणेशोत्सवामुळे चाकरमानी गावाकडे परतू लागले आहेत. घाट रस्त्यावर बंद पडलेली वाहने अणि महामार्गावर वाहनांची वाढती वर्दळ,यामुळे खंबाटकी घाटात मध्यरात्रीपासून वाहतूक कोंडी झाली.दरम्यान,पारगाव-खंडाळ्यापर्यंत वाहनांच्या रांगा लागल्याचे दिसून आले.



अधिक माहितीनुसार, शनिवार,रविवारी असणाऱ्या सलग सुट्ट्यांमुळे मुंबई,पुण्याला असलेले चाकरमानी उत्सवासाठी गावाकडे परतू लागले आहेत.त्यामुळे अशियाई महामार्गावर वाहनांची वर्दळ अधिक असल्याचे दिसून येते.शुक्रवारी मध्यरात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास दोन अवजड वाहने बंद पडल्याचे सांगण्यात आले.बंद पडलेली वाहने अणि वाहनांची वाढती संख्या यामुळे खंबाटकी घाट पुन्हा जाम झाला.

वाहतूक विस्कळीत झाल्याने अनेक पर्यटक,प्रवासी चाकरमानी सुमारे अठरा तास खोळंबल्याची माहीती मिळत आहे.तर काही वेळ बोगदा मार्गे वाहतूक सुरू करण्यात आली होती.सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास वाहतूक पूर्ववत काही अंशी वाहतूक सुरळीत करण्यात यश आले.दरम्यान, क्रेनच्या सहाय्याने वाहने बाजूला करण्यात आली.

यावेळी खंडाळ्याचे पोलीस निरीक्षक सुनिल शेळके, सहाय्यक पोलीस फौजदार राजू अहिरराव,संजय पोळ,प्रकाश फरांदे, संजय जाधव,अमित चव्हाण,श्रीकांत भोसले,महामार्ग पोलीस ए.पी.आय वर्षा शिंदे,पी.एस.आय शाम गोरड,प्रकाश घनवट,सहाय्यक फौजदार अविनाश डेरे,किशोर नलवडे, मिथून मोरे,विजय बागल,रविंद्र वाघमारे, प्रमोद फरांदे,हेमंत ननावरे,मनोज गायकवाड,संतोष कचरे यांनी वाहतूक पूर्ववत करण्यासाठी प्रयत्न केले.मात्र महामार्गावर वाहनांची संख्या अधिक असल्याचे दिसून येते होते.

# बाप्पा मोरयाचा जयघोषाने दुमदुमले पिंपरी-चिंचवड शहर

पिंपरी - गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया, असा जयघोष करत अमाप उत्साह, ढोल ताशांचा दणदणाट, बाप्पाच्या मूर्तीवर फुलांची उधळण करत जल्लोषपूर्ण वातावरणात बाप्पाचे पारंपरिक थाटात श्री गणराचे स्वागत करण्यात आले. छोट्यांमध्ये मोठा उत्साह संचारला होता. बाप्पा मोरयाच्या जयघोषाने शहर दुमदुमले. घरोघरी आणि सार्वजनिक गणेश मंडळांनी विधीवत पूजा करत मोदकाचा नैवेद्य अर्पण करून मूर्तींची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली.

राज्यासह संपूर्ण देशभरात आजपासून गणेशोत्सव उत्सवास सुरवात झाली. पिंपरी-चिंचवड शहरासह उपनगरांमध्येही गणेश चतुर्थींच्या मंगलमय मुहूर्तावर गणरायाचे ढोल-ताशांच्या गजरात स्वागत करण्यात आले. गणेशमूर्ती मुहूर्तावर घरी आणण्यासाठी अबालवृद्धांची सकाळपासूनच लगबग सुरू होती. शहर आणि उपनगरांमध्ये मूर्ती घरी नेण्याचा तसेच सार्वजनिक गणेश मंडळांच्या उत्साह पाहायला मिळत होता. आरती, स्तोत्र आणि मंत्रपठण असे मंगलदायक वातावरण प्रत्येक घरात पाहायला मिळाले. बाप्पा घरी



आल्याने बच्चे कंपनी आनंदाने हरखून गेले होती. मूर्तीची विधीवत प्रतिष्ठापना करून मोदकाच्या प्रसादाचे वाटप करण्यात आले. गणेशोत्सवामुळे सर्वत्र उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

कपाळावर गणपती बाप्पा मोरया'ची फीत बांधून, हातात छोटे ढोल ताशा घेऊन गणेश मूर्ती नेण्याची लहानग्यांचीही मध्येच लुडबूड सुरू होती. ढोल ताशांच्या निनादात लहानग्यांचा उत्साह शिगेला पोहचला होता. बाप्पा मोरयाच्या घोषणा देत आपल्या आवडत्या मूर्ती घरी नेण्यासाठी त्यांची लगबग सुरू होती. गणरायाच्या आगमनाच्या घोषणा देत असलेल्या छोट्या गणेशभक्तांचेही रूप पहाण्यासारखे होते. त्यामुळे परिसरात सर्वत्र आनंदाचे वातावरण पहायला मिळाले

गेला महिनाभर आतुरतेनी वाट पाहत असलेले व तयारी करत असलेल्या सार्वजनिक गणेश मंडळांनी बाप्पाचे पारंपरिक पद्धतीने ढोल ताशांच्या गजरात स्वागत केले. सार्वजनिक मंडळांमध्ये गणरायाची मोठ्या भक्तीमय वातावरणात प्राणपतिष्ठा करण्यात आली. गणरायाची मूर्ती मंडपात विधीवत पूजा करून प्रतिष्ठापना करण्यात आली. मंडळातील कार्यकर्ते गेल्या काही दिवसांपासून तयारीमध्ये गुंतले होते. त्यामुळे गणरायाचे आगमन होताच बाप्पा मोरया'चा जयघोष करत गणेश भक्तांमध्ये नवचैतन्य पसरले होते.